
BVBK-0402265

भारत !
पाच सहस्र वर्षांचा स्फूर्तीदायक इतिहास
अभिमानाने सांगणारा हा पृथ्वीच्या पाठीवरला
प्राचीन, विशाल देश !
अनेक मानवसमूह या भूमीवर आले, वसले, नांदले.
अनेक राज्ये-साम्राज्ये उदयाला आली नि मावळली.
विविध संस्कृती, धर्म, पंथ...
विविध साहित्य, संगीत, शिल्प....
विविध शास्त्र, विज्ञान, कला...
किती तरी गोष्टींतून भारताच्या
अस्मितेची जडण-घडण झाली.
एक विदग्ध, सहिष्णू, विजिगीषू
व नित्यनूतन अशी संस्कृतीही
आकारास आली.
अर्वाचीन भारत
अशा गौरवसंपन्न प्राचीन भारताच्या
मजबूत खांद्यावरच उभा आहे.
आणि त्याच प्राचीन भारताच्या
सांस्कृतिक धडपडीचा हा
एक विनम्र शोध !

# अनुक्रम


| | |
|---|---|
| राजा, प्रजा आणि राज्य | ५ |
| इतिहास-चक्र | १५ |
| इतिहासाच्या प्रभातकाली | २१ |
| प्राचीन भारतातील रहिवासी | ३२ |
| सिंधु-संस्कृती | ४० |
| कृणुध्वम् विश्वमार्य्यम् | ४८ |
| सर्वं आनंदमयं | ५९ |

क्र. 22265 दिनांक 22/7
विषय पा.वा. क्र.



# राजा, प्रजा आणि राज्य

BVBK-0402265

हजारो वर्षांपूर्वीचा काळ!

असा काळ की, आज आपला विश्वासही बसणार नाही.

त्या काळात कोणी एक राजा नव्हता, प्रजा नव्हती, की कोणाचे राज्यही नव्हते.

सगळेच लोक होते. न्यायाने, नीतीने, धर्माने वागत होते. बंधुभावाने, माणुसकीने, सद्धर्माने एकमेकांचे संरक्षण करीत होते. उदरनिर्वाह चालवीत होते. एकमेकांच्या साहाय्याला एकमेक धावून जात असत. एकमेक एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होत असत.

सारे निर्भय होते, स्वतंत्र होते, मुक्त होते, स्वावलंबी होते.

त्यांना राजाची गरजच नव्हती.

त्यांना शासनाची आवश्यकताच नव्हती.

ते सर्वच स्वयंशासक होते.

म्हणून त्यावेळी दंड नव्हता, दंडक नव्हता, किंवा दंडास पात्र असा कोणी मनुष्यही नव्हता.

पण ही राज्यविहीन अवस्था काळाच्या ओघात हळूहळू नष्ट होत गेली. हळूहळू माणसांना स्वार्थ चिकटला. मोह बिलगला. माणसांच्या निर्मळ मनात स्वार्थामुळे इतरांविषयी द्वेष उद्भवला. मोहामुळे विवेक भ्रष्ट बनला. ज्ञानाचा लोप झाला.

या अंधारातच धर्मनाशाचे बीज अंकुरले. असत्याचे तण फोफावले.

माणसांजवळची कर्तव्यबुद्धी हरवली.

सहकाराची वृत्ती मावळली.

अन्याय शिरजोर झाला. सत्याचा मुखवटा घालून मिरवू लागला.

नीती दुर्बल बनली. भीती समर्थ झाली. दोष आणि निर्दोष यांतील फरक लोकांच्या लक्षात येईनासा झाला. विचार क्षीण बनला.

विद्यांचा लोप झाला. कलांचा नाश झाला. यज्ञकार्ये बंद पडली.. पुण्य-कर्मे संपली. वृष्टि थांबली.

अवर्षणामागून अवर्षणे आली. पापांची सुगी पिकली. अज्ञानाची रास ठाकली. क्षुधा अणि तृषा यांनी लोक हैराण झाले. पिचून गेले. पिचून-पिचून गेले.

मग या कर्दमातून वाट काढण्यासाठी उबगून गेलेले सगळे लोक एकदा एकत्र आले. बसून विचार केला. काय होते आणि काय झाले ?

त्यांनी मग ठरवले; आपसात नियम केला. – कठोर भाषण करणारा, निर्दयतेने शिक्षा देणारा, दुसऱ्याचे द्रव्य हरण करणारा, परस्त्रीची अभिलाषा धरणारा–असा जो कोणी असेल त्याला बहिष्कृत करणे इष्ट; म्हणून त्याचा त्याग केला पाहिजे. सर्व वर्णांना विश्वास उत्पन्न करण्यासाठी सारखेच नियम करून त्याप्रमाणे लोकांनी वागले पाहिजे.

नंतर नियम तयार करण्यात आले.

पण या नियमांचे पालन अनेकांकडून झाले नाही. सबलांनी नियम धुडकावले. दुर्बळांचा छळ होऊ लागला. समर्थांकडून असमर्थ नाडले जाऊ लागले. नियम अनियमित झाले. कुंठित बनले.

लोक चिंताक्रांत झाले. त्यांना आपल्या जीवितरक्षणाची चिंता वाटू लागली. ते दुःखी-कष्टी झाले. उदास, भयभीत बनले.

आता करावे तरी काय?

लोक किंकर्तव्यमूढ बनले!

या आपत्तीमधून मार्ग कसा काढावा?

या संकटामधून वाट कशी शोधावी?

यातून बाहेर कसे पडावे?

मूढमनस्क असे ते लोक मग असहाय्य होऊन सर्वजण ब्रह्मदेवाला शरण गेले.

विनम्र होऊन म्हणाले, "हे भगवन्! आम्हांला कोणी अधिपती नाही."

"कोणी नियंता राहिलेला नाही."

"आमचा सर्वनाश होत आहे."

"आमचे द्रव्य हरण केले जात आहे."

"आमचे जीवन सुरक्षित नाही."

"दुःख आणि चिंता यांनी आम्हाला वेढलेले आहे."

"भगवन्! आम्हांला राजा पाहिजे."

"देव! आम्हांला अधिपती पाहिजे."

"त्रात्या! आम्हांला शासनकर्ता पाहिजे."

"तो आमचे पालन करण्यास समर्थ असावा."

"तो आमचा रक्षणकर्ता ठरावा."

"तो शूर-वीर असावा."

"तो राजधर्म जाणणारा ज्ञानी असावा."

"आमच्याकडून तो बहुमानिला जावा."

"तो सर्वश्रेष्ठ योग्यतेचा असावा."

"तो आमचा नृप शोभावा!"

ब्रह्मदेवाने लोकांची मागणी शांतपणाने ऐकून घेतली. लोकांची इच्छा त्याने जाणली. लोकांची गरज ओळखली. पण—

पण राजा कोणाला करावे?

लोकांचा शासनकर्ता नृप कोणाला बनवावे?

प्रजापालकत्व कोणाकडे सोपवावे?....

ब्रह्मदेवालाही प्रश्न पडला.

विचार करता करता एक उत्तम पुरुष त्याला दिसला. त्या उत्तम पुरुषाचे नाव मनू! ब्रह्मदेवाने मनू महर्षीला लोकांचे अधिपतिपद स्वीकारण्याची आज्ञा केली.

परंतु मनू महर्षींनी ब्रह्मदेवाची आज्ञा अमान्य केली. महर्षीला अधिपती होणे रुचले नाही. पटले नाही.

मनू महर्षी म्हणाले, "ब्रह्मदेवा! कोणावर राज्य करणे, शासन चालवणे म्हणजेच मला पापकर्म वाटते. आणि त्यातही सदैव असन्मार्गाने चालणाऱ्या, अन्यायाने वागणाऱ्या माणसांवर राज्य करणे म्हणजे तर आणखीन महान पाप. देवा, मला हे राज्यपद नको."

मनू महर्षीचे हे भाषण ऐकून लोक म्हणाले, "हे महर्षी! तू भिऊ नकोस. राज्यात पाप घडले तर ते त्याच्या कर्त्याच्या माथी बसेल. तुझ्यावर त्याचा भार येणार नाही. तुझे द्रव्यभांडार सदैव समृद्ध राहावे यासाठी आम्ही तुला साहाय्य करू. पन्नास पशूंपैकी एक पशू, सुवर्णाच्या पन्नास भागांपैकी एक भाग आणि आमच्या कोठारातील धान्याचा दशमांश आम्ही तुला कर्तव्यनिष्ठेने, आदराने अर्पण करू. कन्यांच्या

विवाहासंबंधी आमच्यात जर विवाद उत्पन्न झाला तर त्या तुलाच अर्पण करू. शूर व शस्त्रधारी प्रजाजन तुझ्या आज्ञेने राहतील. परचक्र आले असता आक्रमकांचा बीमोड करण्यासाठी प्रजेकडून सैन्य आणि संपत्ती तुला दिली जाईल. म्हणून हे मनू महर्षी, तू आमचा राजा हो आणि आमचे संरक्षण कर. आम्ही तुझी प्रजा बनून तुझ्या आज्ञेत वागू. हे नृपा, तुझा सदैव जय असो!"

इतके सांगितल्यावर मनू महर्षीने लोकांची इच्छा मानली.

नंतर तो महापराक्रमी वीर विशाल सैन्य घेऊन लोकांवर राज्य करण्यासाठी निघाला.

सर्वत्र त्याचा सन्मान होऊ लागला.

सर्वत्र त्याच्याविषयी आदरभाव व्यक्त होऊ लागला.

त्याच्या राज्यात सर्व प्रजा स्वधर्म जाणून वागू लागली.

पापाचरण करणाऱ्यांना मनू महर्षीने शासन करून वठणीवर आणले. प्रजाजनांना निर्भय केले. सुखसमृद्धी दिली. सुरक्षितता निर्माण केली. लोकांचे जीवन सुरळित झाले.

लोकांना शासक लाभला!

प्रजेला राजा मिळाला!

□

प्रजेला राजा मिळाला आणि नियंत्रित शासनाखाली प्रजा नांदू लागली. परंतु एवढ्यानेच केवळ भागत नाही. राजा म्हटल्यावर राजाची काही कर्तव्ये असतात. राजालाही आपला राजधर्म पाळावा लागतो. चांगला राजा वत्सल पित्याप्रमाणे वागून आपल्या प्रजेचे सुख पाहतो. हित जपतो. पण एखादा राजा प्रजापालनाविषयी बेपर्वाई दाखवतो. हाती असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करून प्रजेलाच छळतो. मद्यपान, द्यूत, मृगया आदी

व्यसनांत व विलासात दंग राहतो. राजधर्माचे पालन करीत नाही. आपल्या चैनीसाठी प्रजेवर जाचक, अन्यायी कर लादतो. प्रजा भरडून, होरपळून निघते. अशा वेळी प्रजेलाही मग काही करावे लागते. प्रजा-पालन, न्यायदान, युद्ध, धर्मसंरक्षण आणि योग्य वेळी शत्रूविरुद्ध कारस्थान अशा पाच गोष्टींच्या आधारानेच राजा आपल्या राज्याची भरभराट व समृद्धी करू शकतो. जो राजा हे करीत नाही व प्रजेच्या कल्याणासाठी झटत नाही त्याला प्रजेच्या क्षोभालाही बळी पडावे लागते.

ध्रुव वंशात प्राचीन काळी असाच एक राजा होऊन गेला. त्याचे नाव होते वेन. वेन राजा सुखविलासात सतत बुडालेला असायचा. प्रजेची पर्वा त्याला मुळीच नसे. उलट प्रजेला गुलामांप्रमाणे भरडून काढण्यात त्याला पराक्रम आणि समाधान वाटे.

राजाच असा धर्महीन झाल्यावर राज्यातील दुष्ट प्रवृत्तींच्या लोकांना फावतेच. वेन राजाच्या राज्यात चोर, लुटारू, दरवडेखोर अशांचे थैमान सुरू झाले. प्रजा आणखीनच दुःखीकष्टी झाली. राज्यात सर्वत्र अराजकच माजले. शासनाची घडी पार विस्कटून गेली. प्रजेला कोणी त्राताच उरला नाही. धनधान्य, उद्योगधंदा, संरक्षण कशाचीच शाश्वती उरली नाही.

प्रजेच्या दुःखाची, हालअपेष्टांची गंधवार्ताही भोगविलासात मग्न असलेल्या वेन राजाला नव्हती.

वेन राजाच्या अशा बेदरकार वर्तनामुळे प्रजा असंतुष्ट व संतप्त बनली. राज्यातले सज्जन, विद्वान, योद्धे, कारागीरदेखील संतापून उठले.

या अराजकातून मुक्ती हवी असेल तर राजाला नष्ट केल्याशिवाय ती मिळणार नाही याविषयी त्यांची खात्री पटली. ते म्हणू लागले, "प्रजेवर दोन्हीकडून मोठे संकट ओढवले आहे. काष्ट दोन्ही बाजूंनी पेटले म्हणजे मध्ये सापडलेल्या कृमीकीटकांची जी अवस्था होते तीच गत वेन राजाच्या प्रजेची झाली आहे. एकीकडून दुष्ट, चोर, लुटारू यांचा त्रास आणि

दुसरीकडून अधःपतित राजाचा छळ यांच्यामध्ये प्रजा सापडली आहे. अशा प्रजाघातक्याचा वध करण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाही."

मग प्रथम ब्रह्मवादी मुनींनी अभिमंत्रित केलेल्या दर्भांचा वेन राजावर मारा केला. त्यापाठोपाठ प्रक्षुब्ध प्रजेनेही वेन राजावर अनेक प्रकारांनी अनेकविध प्रहार केले. प्रजाक्षोभापुढे वेन राजा हतबल झाला. त्याची प्रतिकारशक्ती संपली आणि अखेर प्रजेच्या क्षोभाला तो बळी पडला.

प्रजेचेही असे सामर्थ्य असते. राजा आणि प्रजा ह्यांच्यापासूनच राज्य साकार होते. राज्यवृक्षाची ही मुळेच होत.

वेन राजाचा अशा रीतीने अंत झाल्यावर वेनपुत्र पृथू राज्यावर आला.

पृथूच्या राज्यारोहणाचा भव्य सोहळा सुरू होता. पृथू सुवर्णाच्या सिंहासनावर पूर्वाभिमुख बसला होता. त्याची दिव्य आयुधे त्याच्या हाती सिद्ध होती. त्याची तेजस्वी मूर्ती प्रजेच्या आकांक्षा वर्धमान करीत होती. पृथूची राजसभा अमात्य, सेनानी, वीरपुरुष, आचार्य, विद्वत्‌जन, महर्षी, मुनी, तपस्वी, कलावंत, कवी, गायक, नर्तक, वादक आदी गुणीजनांनी शोभली होती.

राजप्रासाद आणि नगरी आनंदोत्सवाने गजबजून गेली होती. मंगल-वाद्यांनी निनादली होती.

यथासांग मंत्र-विधीपूर्वक पृथूला राज्याभिषेक झाला. सर्वांनी पृथूचा जयजयकार केला. श्रेष्ठांनी आशीर्वाद दिले, कल्याण चिंतिले.

मग मानपत्र अर्पण करण्यासाठी काही मुत्सद्यांनी अनुज्ञा मागितली. पण पृथूने ती दिली नाही. विरोध केला.

परंतु प्रजेच्या प्रेमळ आग्रहास्तव अखेर पृथूने संमती दिली.

एक वृद्ध मुत्सद्दी उठला. मानपत्र उलगडून वाचू लागला- "हे राजा, तू महाप्रतापी आहेस. तुझी प्रजाहितदक्षबुद्धी, तुझे शौर्य, तुझे धैर्य, तुझे—"

"थांबा." पृथू गरजला. म्हणाला, "मुत्सद्यांनो आणि विद्वत्‌जनहो, ही वृथा प्रशंसा थांबवा. आपण ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आहात. पण अशी स्तुतीस्तोत्रे तुम्ही का गात आहात हे मला समजत नाही. माझा नुकताच राज्याभिषेक झाला. प्रजेसाठी कसलेही कृत्य करण्याची संधी मला अद्याप लाभलेली नाही. त्यामुळे प्रजाहितदक्ष अशी उपाधी मला लावणे इष्ट, योग्य व सत्य ठरणार नाही. तेव्हा ही स्तुतीस्तोत्रे थांबवा. थोर गुण संपादण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी अवश्य आहे, पण त्यांची प्रत्यक्ष प्रचीती आल्याशिवाय स्तुती करून घेणे मला योग्य वाटत नाही. आता जे गुण अंगी नाहीत ते भविष्यात कधीतरी प्राप्त होतील अशा समजुतीने वा खोटया कल्पनेने मंदबुद्धी माणूस सहज भुलू शकेल. आपली अधिकाधिक स्तुतीस्तोत्रे गायली जावी, अशीही तो अल्पबुद्धी इच्छा धरील. अशा असत्य प्रशंसेने उलट आपला उपहास होतो हेही त्याला कळत नसते. परंतु विचारी सबलांना, जरी ते गुणपंडित असले, तरी आपली व्यर्थ स्तुती त्यांना रुचत नसते. आपणासारख्यांच्या निंदेस पात्र ठरेल असे कृत्य ते विवेकीजन सतत दक्ष राहून टाळत असतात. यास्तव, हे राजनीतीज्ञांनो, माझी स्तुतीस्तोत्रे आळविणे थांबवा! बंद करा!"

पृथूराजाची ही धीरोदात्तता आणि परखड निःस्पृहता प्रजेला अत्यंत रुचली. अंतःकरणापासून आवडली. तिला आपल्या नूतन राजाविषयी आदरभाव वाटू लागला.

पुढे पृथूने राज्यशकट हाती घेतल्यानंतर राज्यातील पृथ्वीचे विषम स्वरूप नष्ट करून टाकले.

भूमीवरील उंचवटे आपल्या तीक्ष्ण बाणांनी छेदून टाकले. टेकड्या भुईसपाट केल्या. भूमी एकसारखी समतल बनवली.

मग पृथ्वीचे दोहन करून पृथूने अन्नब्रह्माची बीजे उत्पन्न केली. नांगरलेल्या भूमीत ती धान्यबीजे रुजवली. पृथूने पृथ्वीच्या पाठीवर

प्रथमच कृषी-उद्योग आरंभिला.

पृथूने केवळ कृषी व्यवसायच सुरू केला असे नव्हे तर पुढे क्रमाक्रमाने नगरे आणि ग्रामेदेखील वसविली.

पृथूने मनुष्याला स्थिरता दिली.

पृथूने माणसाला उत्पादक व्यवसाय दिला.

पृथूने माणसाला संरक्षित समाज दिला.

पृथूचा हा महान पराक्रम पाहून पृथ्वी त्याला शरण गेली !

अफाट सागर आणि उत्तुंग हिमालय यांनी आपली सारी अमूल्य संपत्ती पृथूच्या स्वाधीन केली.

पृथूच्या राज्यात धनधान्याची समृद्धी झाली.

पृथूच्या राज्यात मधुर, निर्मळ जलाची विपुलता झाली.

पृथूने गज, अश्व, रथ आणि पुरुष यांची चतुरंग सेना उभारली.

पृथूच्या विजयी-ध्वजाचा कधीच भंग झाला नाही; तो कधीही मलीन बनला नाही.

पृथूच्या राज्यात दुर्भिक्ष पडले नाही.

पृथूच्या राज्यात प्रजेला परचक्राची धास्ती वाटली नाही की, परस्परांबद्दल भयदेखील उरले नाही.

पृथूने आपल्या प्रजेचे संकटापासून संरक्षण केले म्हणून त्याला क्षत्रिय म्हणतात.

पृथूने प्रजेचे रंजन केले म्हणून त्याला राजा म्हणतात.

पृथूने दंडनीतीच्या साहाय्याने उत्तम राज्य केले. हेरांच्या मदतीने प्रजेच्या वर्तनावर लक्ष ठेवले. शत्रूच्या सर्व मार्गांवर आपल्या सैन्याची तटबंदी उभारली.

पृथूने यज्ञ केले आणि संग्रामात शौर्य गाजवून तो विजयी झाला.

पृथू राजाच्या पराक्रमाचा पृथ्वीला उत्तम प्रत्यय आला होता. ती

पृथूला म्हणाली,

"हे राजन् ! प्रजापालन करणे हेच राजाला कल्याणकारक आहे. प्रजेचे रक्षण न करता तिच्यापासून केवळ करभार मात्र जो घेतो, अशा त्या राजाला त्याच्या कृतकर्माची फळे तर भोगावी लागतातच, पण प्रजेने केलेल्या दुष्कर्मांची फळेही त्यालाच भोगणे प्राप्त असते. हे शूरवीर नृपा, प्रजेचे कल्याण करणे हा जो तुझा धर्म, तो तू कधीही विसरू नकोस, मलीन करू नकोस, वा नष्ट होऊ देऊ नकोस."

पृथूला पृथ्वीने उदंड आशीर्वाद दिले.

पृथूच्या राज्यात भूमी तृप्त होती. ती नांगरल्यावाचून पीक देत होती.

पृथूच्या राज्यात धेनू विपुल दूध पुरवीत होत्या.

पृथूच्या राज्यात प्रजा निरोगी व निर्भय नांदत होती.

पृथूच्या संदर्भातच या विशाल, क्षमाशील व रत्नगर्भा भूमीला 'पृथ्वी' असे नाव मिळाले.

पृथूचे राज्य—हेच पृथ्वीवर माणसाने प्रस्थापित केलेले पहिले राज्य !

□



# इतिहास-चक्र

मनू, वेन आणि पृथू ह्यांच्या ह्या पौराणिक कथा भारताच्या पुराण ग्रंथात मिळतात. त्यांवरून राजा, प्रजा आणि राज्य यांचा केव्हा आणि कसा उदय झाला ह्याची मनोरंजक तशी उद्बोधक माहितीही मिळते. परंतु या कथांना आख्यायिकांचेच स्वरूप आहे. त्यावरून भारताचा इतिहास क्रमबद्ध रीतीने आकलन होत नाही. प्राचीन भारताचा इतिहास जाणून घेण्यात ही एक अडचणही आहे. भारताच्याच केवळ नव्हे तर पृथ्वीच्या पाठीवर जे जे म्हणून प्राचीन देश आहेत त्या त्या देशांच्या प्राचीन इतिहासाची अशीच थोडीफार अवस्था आहे.

भारत हा तर अतिप्राचीन देश आहे. हा जेवढा प्राचीन तेवढाच त्याचा इतिहासही प्राचीन. भारताला असा प्राचीन भव्य इतिहास लाभलेला आहे.

इतिहास म्हणजे तरी काय? माणसाच्या पूर्वकालातील विशिष्ट

घटनांचा आलेख किंवा इतिवृत्त. या दृष्टीने आजची वर्तमानकालीन घटना ही उद्याचा इतिहासच आहे. इतिहासाचे हे एक चक्र आहे.

भूतकाळातील राजकीय उलथापालथी, सामाजिक संघर्ष वा सुधारणा, आर्थिक, धार्मिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकास वा परिवर्तन ह्या सगळ्याच गोष्टींचा इतिहास बनत असतो.

इतिहास हा शब्दच मुळी 'इति–ह–आस' असा बनला असून, 'असे असे घडले' अशी त्याची व्याख्या आहे. 'पुरावृत,' 'प्राचीन कथा' असेही त्याचे अर्थ आहेत. 'इतिहास' कसा असावा किंवा कसा नसावा यासंबंधी दृष्टीकोण व मते आज उपलब्ध आहेत. राजेरजवाड्यांच्या रक्तरंजित लढाया, त्यांच्या राजवटींचे चढ-उतार, सनावळ्या म्हणजेच केवळ देशाचा इतिहास नव्हे तर त्या देशातील सर्वसामान्य जनता, समाजस्थिती, चालीरीती, तत्कालीन साहित्य, शिल्प, वास्तु, कला इत्यादींचाही समावेश इतिहासात केला पाहिजे, असे आधुनिक विचारवंतांचे मत आहे. राजकीय इतिहासापेक्षा सांस्कृतिक इतिहास अधिक चिरस्थायी, प्रेरक व म्हणून महत्त्वाचा मानला जातो.

भारतीय संस्कृतिकोशात इतिहास शब्दाच्या अर्थाविषयी प्राचीन काळीही जी भिन्न भिन्न मते होती, ती दिली आहेत. दुर्गाचार्य नामक पंडिताने म्हटले आहे—

'इति हैवमासीदिति यः कथ्यते स इतिहासः।' म्हणजे 'असे घडले अशा प्रकारे जे सांगितले जाते, तो इतिहास होय.'

काव्यमीमांसाकार राजशेखर नामक दुसरा पंडित म्हणतो—

'स च द्विविधा परक्रियापुराकल्पाभ्याम्।' म्हणजे 'परक्रिया व पुराकल्प अशी इतिहासाची द्विविध गती आहे. परक्रियेत एक नायक वर्णित असतो व पुराकल्पात अनेक प्रधान पुरुष वर्णित असतात. पहिल्याचे उदाहरण आहे रामायण व दुसऱ्याचे आहे महाभारत.

विष्णुपुराणाच्या श्रीधरस्वामीकृत टीकेत इतिहासाचा व्यापक अर्थ सांगितलेला आहे, तो असा—

‘ धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् ।
पुरावृत्तकथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥ ’

म्हणजे–धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांच्या उपदेशाने व पुरावृत्तकथेने युक्त–असा जो वाङ्मयप्रकार–त्याला इतिहास असे म्हणतात.

व्यासांनी इतिहासाचे महत्त्व सांगताना म्हटले आहे—

‘ इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ’

—इतिहास व पुराणे यांच्यायोगे वेदाचे उपबृंहण करावे.

भारतीय वाङ्मयात इतिहास या शब्दाशी मिळताजुळता असा दुसरा शब्द ‘ ऐतिह्य ’ हा आहे. विशिष्ट वक्त्याचे नाव न सांगता जे परंपरागत वृत्त सांगितले जाते, त्याला ‘ ऐतिह्य ’ म्हणतात. ‘ ऐतिह्य ’ शब्दाने इतिहास-पुराणांचे ग्रहण होते, असे भट्टभास्कर नावाचा पंडित म्हणतो.

भारतीय साहित्यात इतिहासाला वेदाच्या बरोबरीने मानले आहे. ऋग्वेद संहितेत इतिहासयुक्त मंत्रांचा संग्रह आहे, छांदोग्योपनिषदात नारदाने इतिहास–पुराणाला ‘ पंचमवेद ’ म्हटले आहे. कौटिल्याने इतिहासवेदाची गणना अथर्ववेदाबरोबर केली आहे.

उत्तरकालीन संस्कृत वाङ्मयात इतिहास याचा दंतकथा किंवा गोष्ट असा सामान्य अर्थ होऊ लागला. त्याला आख्यान, आख्यायिका, कथा इत्यादी प्रतिशब्द वापरले जाऊ लागले. सामान्यतः संस्कृत वाङ्मयात कथेच्या रूपाने केलेला उपदेश म्हणजे इतिहास, असा त्याचा अर्थ प्रामुख्याने गृहीत आहे.

‘ जेव्हा एखादा इसम मरण पावतो, तेव्हा त्याचे इष्टमित्र एकत्र बसून प्रसिद्ध पुरुषांच्या गोष्टी सांगतात व त्याच वेळी मनावर चांगले संस्कार

करणारी इतिहास–पुराणेही सांगितली जातात ' असे गृह्यसूत्रात सांगितले आहे.

राजाने आपल्या दैनंदिन कार्यक्रमात इतिहासाचेही श्रवण करावे, म्हणजे त्यायोगे त्याचे शिक्षण पुरे होते, असे कौटिल्याने म्हटले आहे. तो पुढे सांगतो की, " प्रधानाने इतिवृत्त व पुराण यांचे दाखले देऊन राजाला चुकीच्या मार्गापासून परावृत्त करावे. "

संस्कृत वाङ्मयात महाभारताला ' महापुण्य इतिहास ' असे म्हटले आहे. महाभारतात पुष्कळ ऐतिहासिक गोष्टी येतात; पण त्यात त्यांच्या उपदेशात्मक भागालाच विशेष महत्त्व असते. कौटिल्याने इतिहास हा शब्द समुदायवाचक अर्थाने वापरला आहे. त्याच्या कल्पनेप्रमाणे इतिहासात–

' पुराणमितिवृत्तमाख्यायिकोदाहरणं
धर्म शास्त्रमर्थशास्त्रंचेतिहासः । '

–पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र इतक्या विषयांचा समावेश होतो.

इंग्रजीत इतिहासाला History –' हिस्टरी ' म्हणतात. ' हिस्टरी हा शब्द ' हिस्टोरिया ' या ग्रीक शब्दापासून आलेला असून हिस्टोरियाचा अर्थ ' इन्क्वायरी '–चौकशी असा आहे. म्हणजे ' शोधाअंती चौकशी करून प्राप्त झालेले ज्ञान ' असा हिस्टरीचा अर्थ होतो.

पाश्चात्य इतिहासकारांनीही इतिहासाच्या भिन्न भिन्न व्याख्या केलेल्या आहेत. उदाहरणार्थ–

' History is philosophy teaching by experience. '

–म्हणजे ' इतिहास हे तत्त्वज्ञानाचे सोदाहरण दर्शन आहे. '

' History is past politics. '

– 'इतिहास हे भूतकालीन राजकारण आहे.'

'History is the story of deeds and achievements of men living in Societies.'

-'इतिहास म्हणजे समाजात राहणाऱ्या मानवांची कृत्ये व त्यांनी साध्य केलेल्या गोष्टी यांची हकीकत होय.' अशी विविध मते आहेत.

भारताचा अतिप्राचीन इतिहास,तथाकथित लिखित स्वरूपात किंवा तिथी, वार यासहित अंकित केलेला नाही. म्हणून फ्लीटसारख्या पाश्चात्य इतिहासवेत्त्याने देखील म्हटले आहे की, "प्राचीन भारतातील हिंदूंना इतिहासलेखनातले मर्म व महत्त्व कळले नव्हते की काय ?"

अल्बरूनी नामक इतिहासकारानेसुद्धा असेच उद्गार काढले असून, तो पुढे म्हणतो, "प्राचीन भारतातील एखाद्या घटनेच्या इतिहासासंबंधी जर त्या घटनेचा काल इत्यादी माहिती एखाद्या भारतीय माणसाला विचारली तर तो सरळ आख्यायिका सांगायला सुरुवात करतो."

दुसऱ्या एका इतिहासकारानेही "India has no history but episodes."-भारताला इतिहास नाही 'घटना आहेत.'-असेच म्हटलेले आहे.


भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना व प्रसंग यांच्या काल-निश्चितीविषयी बहुतेक सर्व इतिहासकारांनी असाच निर्वाळा दिलेला आहे. एल्फिन्स्टन नावाच्या इतिहासकाराने तर म्हटले आहे की, "सिकंदराच्या आक्रमणापूर्वीच्या कोणत्याही महत्त्वपूर्ण घटनेची काल-निश्चिती करणे कठीण आहे."

प्राचीन भारतीय इतिहासाच्या संदर्भात ही वस्तुस्थिती आहे. याचे कारणही असे असावे की, प्राचीन काळातील लोकांना काल, तिथी, वार यांपेक्षा घटनेचे महत्त्व अधिक वाटत होते. म्हणून त्यांनी कथा, दंतकथा, आख्यायिका, पुराणे इत्यादी स्वरूपात घटना जतन केल्या. काल-तिथी गौण मानली. इतिहासाकडे पाहण्याच्या दृष्टीकोणातलाच हा फरक आहे.

या दृष्टीने पाहता प्राचीन भारताच्या इतिहासाचा केवढा तरी विशाल, विस्तृत, भव्य पट दृष्टीपुढे येतो ! येथे जड तिथी, वार नसतील, पण कितीतरी प्राचीन मौलिक ग्रंथ, मूर्तिकला, चित्रकला, गृह-स्थापत्य, अन्य विविध ललितकला–आजही दीर्घकालाच्या उदरातून भग्नावस्थेत, अवशेष-रूपात आढळतात; तो देदिप्यमान इतिहास सांगतात. पूर्व दिव्याचे स्मरण करून देतात.

□

दा. क्र. २२६५
विषय



# इतिहासाच्या प्रभातकाली

इतिहासाच्या चक्रावर आरूढ होऊन या प्राचीन भूमीचा परिचय करून घेण्यापूर्वी इतिहासाच्या पहाटकाळी, म्हणजे आरंभी काय स्थिती होती, ह्याचा शोधदेखील उद्‌बोधक होईल.

भारत हा पृथ्वीच्या पाठीवरला एक प्राचीन देश मानला जातो. भारताचा इतिहास आता पाच-सहा हजार वर्षांचा उपलब्ध झालेला आहे. पृथ्वीवरील अन्य देशांचाही असाच कमी-जास्ती कालखंडाचा इतिहास आता वाचता येतो. परंतु या ज्ञात इतिहासाच्याही पूर्वीपासून मनुष्य ह्या पृथ्वीवर राहात आलेला आहे. देश, राष्ट्र, समाज, संस्कृती याची कल्पनाही नव्हती; अशा काळातही मनुष्य होताच. तोही काही करत होता. धड-पडत होता. झगडत होता. ह्या त्याच्या धडपडीचा, झगड्याचाही एक इतिहास आहे.

जीवसृष्टी सततच उत्क्रान्त पावत आलेली आहे. माकडातून माणसाला मानवी रूपात यायलाच सुमारे चार कोटी वर्षे लागली !

मानवाचे ते पहिलेवहिले पूर्वज पशू-पक्ष्यांप्रमाणेच झाडावर राहात होते. कित्येक वर्षे त्यांच्या अंगावर प्राण्यांप्रमाणेच केसही होते. माणसाला सुरुवातीच्या काळात ताठ उभेही राहता येत नव्हते. त्याला पाठीचा ताठ कणा मिळायला आणखी पुढे तीन लक्ष वर्षे लागली !

त्या अती प्राचीन काळी युरोप व आशिया खंडाची हवादेखील आजच्यापेक्षा बरीच उष्ण होती. खूप उबदार होती. माणसाचे ते केसाळ पूर्वज जरा वाकलेल्या पायांचे, बुटके, लहानखुऱ्या आकारमानाचेच होते. ते रानावनात भटकायचे. कंदमुळं शोधायचे. पानं, फळं खायचे. त्यांच्या अंगावर वस्त्रही नव्हते. त्यांना नीट बोलताही येत नव्हते. वाणी-भाषा अवगत व्हायला आणखी पुष्कळ काळ गेला. तोवर निरनिराळे ध्वनी काढून व चीत्कार-आरोळ्या ठोकूनच ते आपल्या मनातील भाव-भावना व्यक्त करत होते. एकमेकांना समजावीत होते.

पोटातली भूक प्राण्याला शहाणपण देते. माणसालाही भुकेसाठी भटकताना, कंदमुळे खोदताना विचार करावाच लागला. आपल्या हाताच्या बोटांनी आणि नखांनी किती खोदणार ? किती उकरणार ? कधी कधी थोडे उकरूनही कंद मिळायचा नाही. मूळ तुटायचे नाही. वणवण भटकूनही उपासमार व्हायची

विचार करता करता त्याच्या लक्षात आले की नखांनी खोदण्यापेक्षा टोकदार दगडाने चांगले खोदता येते.

माणसाने दगड टोकदार–अणकुचीदार बनवायला सुरुवात केली. त्या टोकदार दगडाने मग तो कंदमुळे खोदू लागला. शिकार करून आणलेल्या प्राण्याचे मांस खरवडू लागला.

माणसाला हत्याराचा शोध लागला !

माणूस तोवर कच्चेच मांस खात होता. भूक लागली की कधी एकटाच तर कधी दोघेतिघे मिळून जंगलात जायचे. भक्ष्य शोधायचे. खायचे. भूक शमली म्हणजे डोंगरकपारीला, गुहेत किंवा झाडाच्या छायेत पाय पोटाशी घेऊन बसायचे. पुन्हा भूक लागली, किंवा एखादा बलवान प्राणी चालून आला तर त्या संकटभयानेच उठायचे.

अशा प्रकारे दहा लक्ष पिढ्या गेल्या. मग एके दिवशी या आळसातून त्यांना खडबडून जाग आली. त्यांना प्रचंड आरोळ्या, किंकाळ्या ऐकू आल्या. ते जागे झाले. गोळे विस्फारून, चकित होऊन पाहू लागले. डोंगर-दरीतून, राना-वनांतून, पहाडांच्या कुशीतून अनोळखी प्राणी धावत पळत येत होते. भयभीत झाले होते. भीतीनेच ओरडत होते. आरोळ्या मारत होते.

चकित झालेल्या माणसांनी ज्या दिशेकडून हे प्राणी आले, त्या दिशे-कडे भांबावून पाहिले, तर त्याना भुरे भुरे काहीतरी दिसले. एखाद्या जिवंत अक्राळविक्राळ प्राण्याप्रमाणे ते भुरेभुरे दिसणारे काही तरी पुढे पुढे येत होते.

बघता बघता गार हवा सुटली. थंडीची लाट आली. सगळीकडेच आकाशातून चकाकत्या बारीक बारीक तुकड्यांचा वर्षाव होऊ लागला. उघड्या अंगावर ते पडताच माणसे गारठून गेली. त्यांचे शरीर बधीर झाले. दातखिळी बसली. वेदनेने तळमळू लागले. थंडीने कुडकुडू लागले.

तो पहिला हिमवर्षाव होता !

या हिमवृष्टीपासून बचावण्यासाठी माणसेही पळाली. कित्येकांना भरभर पळताही येईना. जे जलद पळाले आणि पर्वतगुहांच्या आश्रयाला दडले, ते वाचले. अन्य भयंकर थंडीने गारठूनच मृत झाले.

ज्यांनी गुहांचा आश्रय घेतला, त्यांना ऊब मिळाली, व संरक्षण व्हावे म्हणून विचार केला, ते एकमेकांस बिलगून, खेटून बसले. सारे जवळ

जवळ आले. सारे जवळ जवळ आले तर ऊब मिळते, संरक्षण होते ही नवीन जाणीव त्यांना झाली.

सामाजिक जाणिवेची पहिली प्रभात उजळत होती. मानवतेचे भान होत होते.

खाण्यासाठी मारलेल्या श्वापदांची कातडी ते मग अंगाभोवती गुंडाळून घेऊ लागले. थंडीपासून तेवढाच बचाव होऊ लागला. ऊब मिळू लागली.

उघड्यावाघड्या माणसाच्या अंगावर वस्त्र आले!

पाऊस, वारा, बर्फ, ऊन–अशा चमत्कारांबरोबरच त्यांनी एकदा आणखी एक चमत्कार पाहिला. लांबच्या पहाडावर वणवा पेटलेला होता. जंगलातली झाडेझुडे वणव्यात सापडली होती. वणवा वाऱ्याबरोबर पसरत होता. पसरत पसरत बराच दूरवर जंगलभर पसरला होता.

कुतूहलाने माणसे पाहू लागली. हे त्यांना घडलेले अग्नीचे प्रथम दर्शन होते.

पाहता पाहता त्यांना ऊबही जाणवू लागली. थंडीपासून बचाव करायला त्यांना आणखी एक साधन मिळाले. वणवा विझला तशी त्यांना वणव्यात होरपळलेली श्वापदे आढळली. त्यांचे मांस त्यांनी खाल्ले. ते भाजलेले मांस कितीतरी रुचकर लागले.

अग्नीचा उपयोगही त्यांच्या लक्षात आला.

मग माणसांनी अग्नी जतन करून ठेवायला सुरुवात केली. वर्षानुवर्षे ते असा अग्नी जतन करीत असत.

पण जर कधी तो विझला तर मात्र त्यांना अग्नी उत्पन्न करता येत नसे. वणवेही हवे तेव्हा किंवा वरचेवर लागत नसत.

अशीच कितीतरी वर्षे गेली आणि एके दिवशी आणखी एक साक्षात्कार घडला!

एकजण दगडाला दगडाने तासून, तो टोकदार बनवीत होता.

ठक–ठक-ठक–ठक दगडाचे दगडावर घाव बसत होते.

दगडाचे खपले उडत होते.

आणि अशाच काही घावांतून अग्नीच्या ठिणग्या उडाल्या!

माणूस चमकला! त्याचे डोळे लकाकले! दगडावर दगड घासल्याने त्या संघर्षातून ठिणगी उत्पन्न होते हा नवाच साक्षात्कार होता!

माणसाने पुनः पुन्हा दगडावर दगडाचे घाव घातले. ठिणगी पाडली. एक ठिणगी तिथल्याच वाळलेल्या पाला-पाचोळ्यावर पडली. पाचोळ्याने पेट घेतला. जळू लागला. अग्नी प्रज्वलित झाला. माणसाला विस्तव कसा निर्माण करावा याचाही शोध लागला!

विस्तवाचा शोध लागला त्याला आता पन्नास हजार वर्षे होऊन गेली!

दगडाची हत्यारे बनवता येतच होती. पण ती मुठीत धरण्यासारखी, लहान होती. मोठी श्वापदे मारायची तर हत्यारही मोठे, लांब हवे होते.

विचार करता करता युक्ती सुचली. दगडाचे अणकुचीदार हत्यार वांवूच्या किंवा झाडाच्या लांब फांदीच्या टोकाला बसवण्यात आले. मग एक मांसखंड वेलीने बांधून झाडाच्या फांदीला टांगून ठेवण्यात आला. भाल्यासारखे ते हत्यार घेऊन माणूस झाडावर दबा धरून बसला. मांस-खंडाच्या लोभाने श्वापद झाडाखाली आले. माणसाने नेम धरून वरून भाल्याने भोसकले. शिकार साधली!

अशी एखादी शिकार मिळाली म्हणजे त्यांना आनंदी आनंद होत असे. तो व्यक्त कसा करायचा? पण त्यांना तोवर वाणीही लाभली होती. तुटकीफुटकी भाषा त्यांच्या मुखांतून जन्म घेत होती. पण बोलायच्या आधी ती माणसे गाऊ लागली असावीत. झकास शिकार साधली किंवा स्वच्छ सूर्यप्रकाश पडला म्हणजे त्यांना फार फार आनंद होत असे. नाना तऱ्हेच्या स्वरांनी, आलापांनी ती माणसे तो आनंद व्यक्त करू लागली.

हळूहळू त्यांना 'क' सारखी काही व्यंजने उच्चारता येऊ लागली. त्यांच्यातील जे अधिक प्रतिभावान व प्रगतीशील होते ते आपल्या मनी येणारे नवनवीन विचार, कल्पना अधिक चांगल्या रीतीने व्यक्तवू लागले. आपल्या आवाजात भर घालून, त्याला काही जोडून ते विचार प्रकट करण्याचा प्रयत्न करू लागले. यातूनच मानवी भाषेतील पहिली अक्षरे उमटली ! माणसाला वाणी लाभली. भाषा मिळाली.

विस्तवाचा शोध, दगडाची हत्यारे, कातडीची पांघरुणे, भाषा या गोष्टी साध्य झाल्यामुळे माणूस अन्य प्राण्यांहून वेगळा झाला. या वेगळ्या माणसांना 'जुन्या अश्मयुगातली' माणसे म्हणतात. कारण या माणसांची सर्व उपकरणे दगडाचीच होती.

आणखी कित्येक वर्षे लोटली आणि या माणसाला आणखी काही समर्थ, शक्तीशाली हत्रे असे वाटू लागले. तो अस्वस्थ झाला. आणि या अस्वस्थतेमधूनच त्याला आणखी एक अत्यंत महत्त्वाचा शोध लागला.

त्याने देव निर्माण केला.

देवाचा शोध कसा लागला याविषयी पुष्कळच उपपत्ती उपलब्ध आहेत. परंतु त्यातील पुढील उपपत्ती अधिक संभवनीय आहे.

मनुष्य आपले प्रतिबिंब पाण्यात पाहत असे. त्याला झोपेत स्वप्नही पडे. त्या स्वप्नात जिवलगांच्या, सोबत्यांच्या आकृत्याही त्याला दिसत असत. माणसांना वाटे, आपल्याला दोन शरीरे आहेत. एक हे इंद्रियगम्य व दुसरे स्पर्श न करता येण्यासारखे-अदृश्य असणारे--कधी मधी दिसणारे. मनुष्य मेल्यावर त्याचे हे शरीर नष्ट होते, पण ते दुसरे शरीर उरतेच. ते स्वप्नात दिसते. तेव्हा ते शरीर कोठे तरी, जिवंत असलेच पाहिजे. ते सामर्थ्यशाली आहे, म्हणून त्याच्याविषयी भयही निर्माण झाले. त्या भयातूनच त्याला प्रसन्न ठेवण्यासाठी पूजाअर्चा, प्रार्थना, देणग्या यांची प्रथा सुरू झाली. एक गूढ अलौकिक कल्पनेचे वलय माणसांच्या मनात

निर्माण झाले. देव–दैव–धर्म–एकातून एक निर्माण झाले.

धर्माच्या पाठोपाठ कला आली. शिकार चांगली मिळावी म्हणून इच्छित प्राण्यांची चित्रे माणूस आपल्या राहत्या गुहांच्या तोंडावर रेखाटू लागला. भाल्याने त्यावर नेम धरून शकून पाहू लागला. नेम बरोबर बसला तर शिकार साधणार, शिवाय चित्र जितके हुबेहूब तितकी शिकारीची शक्यताही अधिक, अशा कल्पना रूढ होऊ लागल्या.

माणसाने प्रगतीच्या प्रवासातच आणखी काही जोडले. काही प्राणी त्याने पाळले. गाय, म्हैस, बकरी यांना जवळ केले. त्यांचे दूध तो काढू लागला. दुधाचा उपयोग करू लागला. मुलाबाळांना पाजू लागला.

दुधासाठी पशूपालन होऊ लागलेच, पण वेळप्रसंगी शिकार मिळाली नाही, उपासमार होऊ लागली तर ह्या पशूंवर निर्वाह करता येऊ लागला.

एका जंगलातली शिकार संपत आली म्हणजे माणसांना दुसरे जंगल शोधावे लागू लागले. त्यांची टोळीच्या टोळी अशी स्थलांतरे करीत हिंडे. हिरवागार चारा पाळीव पशूंसाठी दिसला म्हणजे तेथे ते मुक्काम करीत.

या भटकंतीतही उपासमार होई. शिकार मिळवायला त्रास पडे. वाढती भूक आणि वाढती पोटे पशूपालनावर भागवणे कठीण होई.

या अडचणीतून माणसाने रानावनातले धान्य वेचले. त्यावर भूक भागवायला आरंभ केला. हळूहळू त्याची रुची जडली. पण धान्यही कसे पिकवायचे हे त्याला माहीत नव्हते. सहज उगवलेले हाती लागेल तेच तो आणत होता.

अशी आणखी कितीतरी वर्षे लोटली. एकाच्या लक्षात आणखी एक चमत्कार आला. त्याने धान्य कापायला जाताना अनेक वेळा पाहिले होते, की काही दाणे जमिनीवर सांडतात. त्यांचीच पाऊस पडल्यावर रोपे

होतात. ती वाढतात. त्यांनाच धान्याच्या लोंब्या, कणसे येतात ! मग जवळचे थोडेसे धान्य आपणच जमिनीत टाकले तर ?

त्याने तसे केले आणि पेरले होते त्याच्या कितीतरी पट धान्य घेतले. माणसाला नवीन प्रचीती आली.

माणसाला शेतीचा शोध लागला.

माणूस शेतकरी बनला. जमिनीतून धान्य काढू लागला. जमिनीवर कष्ट करून राहू लागला.

या सुधारलेल्या माणसांना 'नव्या अश्मयुगातील' माणसे म्हणतात. ह्या माणसांना आता मातीची भांडी बनवता येऊ लागली होती. त्या भांड्यांतून ते अन्न शिजवू लागले होते. दगडी उपकरणांतही सुधारणा झाली होती. त्यांच्यावर ते सुंदर मुलामा चढवू लागले होते. गाई-मेंढ्या-बरोबरच कुत्रा, घोडा हे प्राणी पाळायला आरंभ केला होता. कपडा विणण्याची कलाही त्यांना अवगत झाली होती. माणसांना शेतीमुळे स्थैर्य आले होते. ती झोपडी करून राहू लागली. हिंस्र श्वापदे किंवा दुसरे लोक यांना एकदम हल्ला करता येऊ नये म्हणून ते आपल्या झोपड्या तळ्याच्या मध्यभागी पाण्यात बांधीत असत. त्यामुळे ह्या लोकांना 'तलावात राहणारे लोक' असेही म्हटले जाई.

ह्या माणसांच्या प्रगतीचा वेग तसा झपाट्याचा होता. तांब्याची व काशाची अवजारे करण्यासही त्यांनी पुढे सुरुवात केली.

परंतु अश्मयुगाच्या अखेरीस माणसांवर एक फार मोठी आपत्ती कोसळली होती. त्यावेळी आजचा भूमध्य समुद्र हा मुळी विशाल समुद्र नव्हताच तर त्या ठिकाणी मोठमोठी सरोवरे होती. त्यातून पुष्कळ लोक राहत असत. पुढे एकाएकी युरोप व आफ्रिकेमधील जिब्राल्टरच्या शेजारची जमीन वाहून गेली आणि अटलांटिक महासागरातील पाणी भूमध्यसमुद्राच्या सखल खोऱ्यात वाहू लागले. हे पाणी सर्वत्र एकसारखे पसरत

चालले व खोरे तुडुंब भरले. त्यामुळे पूर्वीच्या सरोवरात झोपड्या करून राहणारे व आसपासचे कित्येक लोक त्या लोंढ्यात बुडून मृत्यू पावले. चोहोबाजूंनी पाण्याने वेढल्यामुळे त्यांना बुडून मरण्याशिवाय गत्यंतरच उरले नाही. शेकडो मैल पाणीच पाणी झाले. ते सारे खोरे जलमय झाले; शेवटी भूमध्य समुद्र निर्माण झाला.

ह्या जलप्रलयासंबंधी अनेक तऱ्हेच्या कथा अनेक देशांत आजही प्रचलित आहेत. त्या मोठ्या मनोरंजकही आहेत.

एक कथा पश्चिम आशिया आणि तिथून रूपांतरित होऊन उत्तर आफ्रिकेत गेली. ती बायबलमध्ये दिली आहे :

ईश्वराने हजरत नूह नामक महापुरुषाला या जलप्रलयाची कल्पना देऊन सावध केले होते. त्यामुळे हजरत नूहने एक जहाज तयार केले आणि त्या जहाजात सर्व प्राण्यांची एकेक जोडी ठेवली. त्यानंतर चाळीस दिवस व चाळीस रात्री मुसळधार पाऊस पडला. आकाश, पृथ्वी व समुद्र एक होऊन गेले. चोहोकडे पाणीच पाणी झाले. सर्व बुडून गेले. फक्त नूहचे जहाज तेवढे वाचले.

चाळीस दिवसांनंतर जेव्हा पाऊस थांबला तेव्हा ते जहाज वाहत वाहत अरारत पर्वताच्या शिखरावर जाऊन थांबले.

कालांतराने नूहने आणलेल्या जोड्यांपासून हळूहळू नवीन सृष्टी वाढली.

दुसरी कथा पारशी लोकांत प्रचलित आहे :

ऐर्य्यन वेइजो या देशात हिमवृष्टी सुरू झाली. थंडीचा गारठा वाढला. दिवसरात्रीचे स्वरूप बदलून गेले.

अहुरमज्दने यिम याला आधीच प्रलयाची सूचना देऊन सावध केलेले होते.

यिमने त्यानुसार मोठा वाडा बांधून ठेवला होता. तो त्या वाड्यात

राहायला गेला. नंतर तिथे हळूहळू सृष्टीची वाढ झाली.

तिसरी कथा भारतातच प्रचलित आहे. हिच्या पौराणिक रूपात थोडा-फार फरक आहे, पण मूळ कथा एकच आहे. ती शतपथ ब्राह्मणात दिलेली आहे :

एकदा प्रातःकाळी मनूच्या हातात एक लहानसा मासा आला आणि मनूला म्हणाला,

" माझा सांभाळ कर! कारण लवकरच फार मोठा महापूर येणार आहे. पृथ्वी जलमय होणार आहे. त्यायोगे सर्व प्राण्यांचा नाश होणार आहे.

ओघ इमाः सर्वाः प्रजा निर्वोढा ।

त्यावेळी मी तुझे रक्षण करीन."

मनूने माशाला सांभाळले.

मासा दिवसेदिवस वाढत गेला. प्रलयाचा काळ येऊन ठेपला. त्यावेळी त्या माशाच्या आदेशानुसार मनूने एक नौका तयार केली.

पाण्याचा ओघ गरजत आला, तेव्हा मनूने नौकेचा दोर माशाच्या शिंगात अडकवला.

तस्य श्रृन्गे नावः पाशं प्रतिमुमोच ।

माशाने ती नौका खेचून उत्तरेकडल्या पहाडाकडे नेली.

तेनैतमुत्तरं गिरिमतिदुद्राव ।

तेथे पोचल्यावर माशाने मनूला सांगितले की, जोवर पाणी चढते आहे तोवर नौका झाडाला बांधून ठेव!

मनूने तसे केले.

(– या जागेला 'मनोरवसर्पणम्'–मनूची उतरण्याची जागा म्हटले आहे. महाभारतात याला 'नौबन्धनम्'–नाव बांधण्याची जागा, असे म्हटले आहे.)

नंतर पाणी उतरले, तेव्हा मनू एकटाच वाचला होता.

मनुरेवैकः परिशिशिषे ।


मनूने पाक यज्ञ केला. काही काळाने तेथे 'श्रद्धा' नावाची स्त्री उत्पन्न झाली. तिच्यापासून मग मानवी प्रजेची सृष्टी निर्माण झाली.

जग–प्रलयाच्या अशा कथा जगभरच्या लोकसाहित्यातही विपुल आहेत.

तळ्यांमधून घरे करून राहणाऱ्या लोकांच्या विषयी अधिक माहिती इतिहासाला ज्ञात नाही; कारण हजारो वर्षे होऊन गेली. तत्कालीन खाणाखुणा फारशा उपलब्ध नाहीत. परंतु आज जगभर पसरलेले बहुतेक सर्व लोक किंवा मानव-वंश हे बहुधा त्या अश्मयुगीन लोकांचेच वंशज असले पाहिजेत. आज आपण पांढरे, पिवळे, पिंगट, काळे ह्या वर्णांचे लोक पृथ्वीवर पाहतो. परंतु ह्या चार वर्णातच सारे मानववंश आज वाटता येणार नाहीत. कारण पुढील काळात ह्या मानववंशांचे एकमेकात बरेच मिश्रण होऊन गेलेले आहे. हा प्रकार मानवाच्या स्थलांतरानेही घडून आलेला आहे. एका ठिकाणी राहात असलेला मानवसमूह काही नैसर्गिक, भौगोलिक वा अन्य कारणांमुळे आपला प्रदेश सोडून अन्य प्रदेशात वसतीकरता गेला, असे घडले आहे.

ध्रुवाजवळच्या प्रदेशात स्थिर झालेल्या माणसांना, तेथील परिस्थितीत कालांतराने बदल घडून आल्यामुळे त्या प्रदेशाचा त्याग करावा लागला. राहत्या माणसांची संख्या वाढली, त्यामुळे अन्नाची कमतरता जाणवू लागली. गुरांना चाराही पुरेनासा झाला. थंडीचा त्रासही वाढला. मग हे लोक, पोटासाठी दाही दिशा म्हणतात, त्याप्रमाणे टोळ्याटोळ्यांनी जगभर विखुरले. काही युरोप खंडात गेले, काही इराणमध्ये वसले, तर काही भारतातही आले. भारतात आलेल्या ह्या लोकांनाच 'आर्य' म्हणतात.

□



# प्राचीन भारतातील रहिवासी

आर्य लोक भारतात आले आणि येथे त्यांनी वसती केली हे खरे, पण भारतामध्ये तत्पूर्वी लोक राहतच होते.

जगाच्या कोणत्या भागात मानवप्राणी प्रथम निर्माण झाला, हे जसे निश्चितपणे सांगणे कठीण आहे, तसेच माणसाने आपल्या पहिल्या वहिल्या वसाहती कुठे स्थापन केल्या हे देखील नक्की सांगणे फार कठीण आहे.

पृथ्वीच्या पाठीवर एकाच कालखंडात मानव प्राण्याची उत्पत्ती झाली असण्याची शक्यता आहे. आणखीही शक्यता व अनुमान असू शकते. परंतु एक गोष्ट तर उघडच दिसते की, हिमयुगातील अजस्र हिमनग ओसरून ते उत्तरेकडे हटत चालले तेव्हा मनुष्य ती थंडी टाळून उष्ण हवामानाच्या प्रदेशात राहात असावा. पुढे बर्फ जेव्हा पूर्णपणे विरघळून गेले असेल तेव्हा आजच्या टंड्रासारखी विस्तीर्ण व सपाट मैदाने जिकडे तिकडे पसरली असावीत. कालांतराने त्यांवर गवत वाढले असावे. त्या

गत्रताळ प्रदेशातून मग आपली गुरेढोरे घेऊन त्यावेळचे लोक भटकत असावेत. जे एका जागी राहात नाहीत व सारखे इकडे तिकडे भटकत असतात अशांना वंजारी लोक म्हणतात.

अशा भटक्या लोकांच्या जमाती आजही जगभर आहेत. भारतातही आहेत.

स्थिर वृत्तीच्या लोकांनी सुरुवातीला ज्या वसाहती केल्या त्या नद्यांच्या काठावर केलेल्या दिसतात. नद्यांच्या आसपासची भूमी गाळाने सुपीक व उपजाऊ असते हे एक महत्त्वाचे कारण असणार, आणि दुसरे म्हणजे पाण्याची मुबलकता.

हिंदुस्थानात सिंधु, विपासा, शतद्रु, वितस्ता, ह्यांसारख्या मोठ्या मोठ्या नद्यांच्या काठी येथील अतिप्राचीन लोकांनी वसाहती केल्या असाव्यात. त्याचप्रमाणे मेसॉपोटेमियात यूफ्रेटीस व टायग्रीस, इजिप्तमध्ये नाईल व चीनमध्येदेखील अशाच मोठ्या नद्यांच्या काठी प्रथम प्राचीन वसाहती झाल्या असाव्यात.

अतिप्राचीन काळी हिंदुस्थानात कोणकोणत्या जातीचे लोक राहत होते, त्यांचा परस्परांमध्ये व्यावहारिक संपर्क, बौद्धिक आदान-प्रदान व रक्त संमिश्रण प्रस्थापित झाले होते की नाही, हे सारे मुद्दे वादग्रस्त आहेत. यावर विद्वानांत मतभिन्नता आहे. परंतु तत्कालीन भारतामध्ये पुढील सहा आदिम जातीय लोक वसत होते याबद्दल त्यांच्यांत बरेच मतैक्य आहे :

(१) नीग्रेटो, (२) प्रोटो–ऑस्ट्रेलाइड, (२) मंगोलाइड, (४) भूमध्यसागरीय, (५) पश्चिमी ब्रॅचीसेफल, व (६) नार्डिक. परस्पर रक्तसंबंधांमुळे यांपैकी एकही जात विशुद्ध स्वरूपात आज आढळत नाही.

**नीग्रेटो**—ह्या जमातीचे लोक भारतात जवळ जवळ नाहीत. ही जात बहुतेक लुप्त झाली आहे; पण अंदमान बेटांमध्ये या जातीचे काही

अवशेष आढळतात. तसेच आसाम, नागाभूमीतील काही जाती व त्रावणकोर-कोचीन इत्यादी भागातील काही आदिम जाती यांमधून नीग्रेटो जमातीची काही वैशिष्ट्ये मात्र दिसून येतात.

परंतु नीग्रेटो ही भारतामधली अतिप्राचीन जमात होती. शक्यता अशी आहे की हे लोक आफ्रिकेमधून अरबस्तान, इराण आणि बलुचिस्तान या प्रदेशांतून हिंदुस्थानात आले असावेत व येथून ते पुढे मलाया, फिलिपाइन्स, न्यू गिनी आणि अंदमान आदी प्रदेशात गेले असावेत. या प्रदेशात ते जलमार्गानेच गेले होते, त्यावरून ते नाविक विद्येत पारंगत असावेत असे अनुमान निघते.

उदर-निर्वाहासाठी रानावनातील कन्दमुळे, फळे यांवर व पशूंच्या शिकारीवरच त्यांना अवलंबून रहावे लागत होते. शिकार करण्यासाठी त्यांनी धनुष्यबाण तयार केला असण्याची शक्यता आहे. समुद्र-सान्निध्यात राहात असल्यामुळे यांना मासेही पकडता येत होते. शेती-पशुपालन त्यांना मुळीच ठाऊक नसावे. ही जमात अतिप्राचीन असल्यामुळे रानटी होती. पुढील काळातील मानव संस्कृतीवर हिचा उल्लेखनीय असा काही प्रभाव त्यामुळेच पडलेला नाही.

प्रोटो-ऑस्ट्रेलाइड जातीचे लोक हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी नीग्रेटोंचा पराभव केला.

**प्रोटो–ऑस्ट्रेलाइड**– हे लोक फिलीस्तीन प्रदेशातून हिंदुस्थानात आलेले होते. येथून ते ब्रह्मदेश, इण्डोचीन, मलाया, इण्डोनेशिया आणि ऑस्ट्रेलिया या देशात गेले. या सर्व देशांतून आजही या जमातीचे अंश आढळतात. भारतामधील निकृष्ट दर्जाच्या, विशेषतः कोल व मुण्डा जातींमध्ये हा वंश अंशरूपाने दिसतो.

आर्यांनी ज्यावेळी भारतात प्रवेश केला, त्यावेळी या वंशाचे लोक पंजाब, उत्तर भारत व दक्षिण भारतात वसती करून होते.

'अनास', 'कृष्णवर्ण' व 'निषाद' हे शब्द या प्रोटो-ऑस्ट्रेलाइड लोकांना उद्देशूनच कदाचित आर्यांनी वापरलेले असावेत. जसजशी आर्यांची संस्कृती व सुधारणा हिंदुस्थानात रुजत गेली, तसतशी ही जमात आर्यांमध्येच विलीन होऊन गेली. परंतु ह्या विलीनीकरणानंतर देखील आर्यसंस्कृतीवर ह्या जमातीचा बराच प्रभाव शिल्लक राहिला.

या शास्त्रातील विद्वानांचे तर असे मत आहे की, हिंदू धर्मात व संस्कृतीत काही गोष्टी अशा आहेत की ज्या आर्यांच्याही नाहीत व द्रविडांच्याही नाहीत,— त्या या प्रोटो-ऑस्ट्रेलाइड लोकांच्याच आहेत. उदाहरणार्थ हिंदूधर्मातील नाग, मकर, गणेश आदी पशू-देवता, अवतार, व अंड्यामधून सृष्टीउत्पत्तीची कल्पना ह्या गोष्टी म्हणजे या जमातीची देणगी आहे. त्याचप्रमाणे पुनर्जन्माचा सिद्धान्तही याच लोकांबरोबर हिंदुस्थानात आला. एखाद्यावरून उतरून टाकून अशुभ निवारण करण्याची प्रथा, कुंकुम तिलक व गोंदण्याची पद्धती इत्यादी गोष्टी याच जमातीने दिलेल्या आहेत.

हे लोक शेतकरी होते. कृषिकर्म यांना ठाऊक होते. यामुळे हिंदुस्थानात याच लोकांमुळे शेती सुस्थिर झाली. पशूपालन व वस्त्र-निर्मिती यांना माहीत होती. सूतकताई व वस्त्र-विणाई या कला यांना अवगत होत्या.

हे लोक टोळी करून राहात होते. ते अत्यंत कष्टाळू जसे होते तसेच मनोविनोदनातही त्यांना रुचि होती.

**मंगोलाईड**— कित्येक प्रादेशिक भिन्नता सामावून घेऊन ही जमात सिक्किम, भूतान, आसाम व भारत—ब्रह्मदेशाच्या सीमेवर आजही अवशेष-स्वरूपात आढळते.

**भूमध्यसागरीय किंवा द्रवीड**— या वंशाच्या पुष्कळ शाखा आहेत. परंतु हिंदुस्थानात 'द्रविड' म्हणून ओळखली जाणारी शाखा महत्त्वाची

आहे. द्रविडांचे जातीय वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे मोठे मस्तक, छोटे नाक, लहानखुरी शरीरयष्टी व काळा रंग.

आर्य लोक येण्यापूर्वी द्रविड व प्रोटो-ऑस्ट्रेलाइड वंशांचे लोक येथे सहकार्याने राहिलेले होते. त्यांच्यात पारस्परिक सांस्कृतिक आदानप्रदान व संमिश्रणही होत असे.

बलुचिस्तानात 'ब्राहुई' नावाची भाषा प्रचलित आहे. ही द्रविड भाषा आहे. यावरून असे अनुमान निघते की, केवळ बलुचिस्तानातच नव्हे तर सर्व पंजाब, सिंध, माळवा व महाराष्ट्र ह्या पश्चिमोत्तर प्रदेशात द्रविडांचे वास्तव्य होते. गंगा–यमुनेच्या खोऱ्यातल्या काही जमातीतही द्रविड–वंश–वैशिष्ट्य अंशरूपाने आढळलेले आहे. तेव्हा या भागातही द्रविडांचे वास्तव्य असले पाहिजे. बंगालमध्येही द्रविड होते याच्या अशाच खाणाखुणा भेटतात.

दक्षिण भारतात आज प्रचलित असलेल्या अनेक भाषा या द्रविड भाषेपासून जन्माला आलेल्या आहेत. यावरून द्रविड लोक उत्तरेप्रमाणे दक्षिण भारतातही वास्तव्य करीत होते हे उघड दिसते.

काही विद्वानांचे तर मत आहे की, आर्य ज्यावेळी हिंदुस्थानात आले त्यावेळी इराण व अफगाणिस्तानमध्येही द्रविडवंशीय लोक राहात होते. ऋग्वेदातील ' दस्यु ' व ' दास ' हे शब्द द्रविडांना उद्देशूनच वापरलेले आहेत. इराणी भाषेतही ' दस्यु ' हा शब्द आढळतो. या सर्व साक्षीवरून द्रविड लोक पुष्कळ होते व द्रविड संस्कृतीही खूप विस्तारलेली होती हे स्पष्ट होते.

द्रविड मूळचे कुठले, ह्याविषयी विद्वानांत मतभेद आहेत. काहींचे म्हणणे, द्रविड हे मूळचे हिंदुस्थानातले रहिवासी, पण काहींचे मत ते बलुचिस्तानकडले.

प्राचीन काळी या ज्या मानव टोळ्या इकडून तिकडे आल्या नि

गेल्या त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या आदिदेशात जीवननिर्वाहाला आवश्यक व पुरेशा अन्नधान्याचा तुटवडा किंवा नैसर्गिक आपत्ती. भारताची प्रकृती ही सदैव उदार, सहिष्णु व आतिथ्यशील असल्यामुळे भारताने बाहेरून जे आले त्या सर्वांनाच इथे आश्रय दिला. द्रविडही असेच कदाचित बाहेरून आले असतील. द्रवीड मंगोलवंशीय होते व उत्तर–पूर्वेकडून ते हिंदुस्थानात आले असे आता कोणी मानत नाही. अधिकांश विद्वानांचे मत आहे की, द्रवीड हे भूमध्य सागरीय प्रदेशातील असून आशिया–मायनर, फिलिस्तान येथून आलेले आहेत. हडप्पा आणि मोहोनजोदडो येथील उत्खननात सापडलेल्या नाण्यांवरची लिपी जोवर वाचता येत नाही तोवर या संस्कृतीचे प्रणेते कोण हेही निश्चित-पणाने सांगता येणार नाही. परंतु या सिंधुसंस्कृतीचे प्रणेते द्रविडच असले पाहिजेत असेही वहुसंख्य विद्वानांना वाटते.

प्रोटो-ऑस्ट्रेलाइड लोकांची संस्कृती ग्राम-प्रधान होती. तिच्यात खेडेगाव मुख्य होते व शेतीलाही प्राधान्य होते. द्रविडांची संस्कृती नागरी होती. हिंदुस्थानात सर्वप्रथम द्रविडांनी नगरे वसवली आणि सागरी-व्यापाराला पुष्कळच उत्तेजन दिले. द्रविडांनीच प्रथम नद्यांवर पूल बांधले. बंधारे घातले. व्यापाराशिवाय द्रविडांना शेतीचेही ज्ञान होते. अनेक तऱ्हेची धान्ये ते पिकवत असत. सूतकताई, विणाई आणि रंगाई या कला त्यांना ज्ञात होत्या. धातूंचा उपयोगही ते जाणत होते आणि त्यांची विविध तऱ्हेची अवजारे, भांडी, आभूषणे करून ते वापरीत होते. द्रविडांनी वास्तुकलेतही उन्नती केलेली होती. त्यांची घरे पक्क्या विटांची व दगडांची असत. मृण्कला—मातीकामही त्यांना माहिती होते. मातीची अनेक तऱ्हेची सुंदर आकाराची भांडी ते बनवीत असत.

द्रविड-समाजपद्धती मातृप्रधान होती. त्यांच्या धर्मकल्पनेत मातृदेवीला सर्वश्रेष्ठ स्थान होते. या समाजातील व्यक्ती आपल्या मातेच्या संपत्तीची

वारस ठरे, पित्याच्या नाही. अशा तऱ्हेच्या अनेक अनार्य प्रथा दक्षिण हिंदुस्थानात प्रचलित होत्या. मातुल व चुलत घराण्यातील भावा-बहिणींची लग्ने होत असत. दक्षिणेत ही प्रथा आजही आढळते.

द्रविडांची देवी-उपासना फारच प्राचीन, म्हणजे ते आपल्या आदि-देशात राहत असल्यापासूनची असावी. 'परम नारीच्या' बरोबरच 'परम पुरुषाची'ही कल्पना त्यांनी बाळगलेली होती. हा परमपुरुष पशुपती शिव या रूपात ते पाहत असत. विद्वानांच्या मते 'शिव' हा शब्दच द्रविड भाषी असून त्याचा अर्थ 'लाल' असा आहे. आर्य परंपरादेखील शिवाला 'नीललोहित' नावाने संबोधते.

हिंदुस्थानात प्रोटो-ऑस्ट्रेलाइड लोकांनी 'लिंगपूजा' सुरू केली, पण पुढे द्रविडांनीही ती स्वीकारली होती. द्रविडांमध्ये पशूपूजाही प्रचलित होती. त्यातही नागपूजेला विशेष प्राधान्य होते. हिंदूधर्मातील गणेश, हनुमान, गरूड आदींची पूजा करण्याची पद्धती ही द्रविड-संस्कृतीतच विकसित झालेली आहे. पशूबरोबरच द्रविड वृक्षपूजाही करीत असावेत. फल-मूल, पुष्प-पत्र, जल आदींनी पूजा करण्याची पद्धती आर्य नाही, ती द्रविडांनीच रूढ केली असावी.

द्रविडांच्या अंमलाखालील प्रदेश छोट्या छोट्या जिल्ह्यात विभागलेला होता. त्यावर त्यांचे वेगवेगळे राजे होते. हे राजेलोक दगड-विटांच्या प्रचंड घरात राहात असत. ही घरे म्हणजे त्यांचे दुर्गच होते. शासन व समाजसंचलनासाठी द्रविडांनी अनेक प्रकारचे कायदे केलेले होते.

युद्धात धनुष्यबाण, तलवार, बर्ची, भाला इत्यादी हत्यारांचा उपयोग ते करत असत, परंतु घोड्याचा उपयोग करून घेण्याइतपत अश्वविद्या व अश्वारोहण त्यांना अवगत नव्हते.


**पश्चिमी ब्रॅचीसेफल आणि नॉर्डिक**– ह्या दोन वंशांचा भारतीय संस्कृतीवर काहीच प्रभाव पडलेला नाही. त्या लोकांना भारताच्या

इतिहासतही महत्त्वपूर्ण असे स्थान नाही, किंवा भारतीय संस्कृतीला त्यांची महत्त्वाची अशी देणगीही नाही.

प्राचीन भारताची जडण-घडण करण्यात तशी बहुमोल कामगिरी द्रविडांनीच प्रारंभाच्या काळी केलेली आहे. आर्य-पूर्व भारताला द्रविडांनीच सांस्कृतिक इतिहास दिलेला आहे.

□

म. सं. सं. ठाणें,
दा. क्र. 22.6.5
दिनांक 25/9/88 क्र.



# सिंधु–संस्कृती

१८५६ सालची गोष्ट आहे. इंग्रजी सत्तेचा अंमल हिंदुस्थानवर सुरू होऊन सुमारे चाळीस वर्षे झाली होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या नावाखाली ब्रिटिश साम्राज्य मूळ धरीत होते. रेल्वे, टपाल, शाळा आदी सोयी–सुधारणा होत होत्या.

कराची ते लाहोर असा रेल्वेमार्ग इंग्रज सरकारने तयार करायला घेतला होता. काम सुरू होते. रस्त्यासाठी विटांची गरज लागली; तेव्हा त्यावेळच्या तिथल्या इंजिनियर लोकांनी अवतीभवतीच्या भग्नावशेषातून विटा खोदायला मजुरांना सांगितले. त्याच परिसरात मुल्तान जिल्ह्यातील हडप्पा नावाचे एक ठिकाण येते. तिथेही बरेच भग्नावशेष होते. खोदता खोदता त्यांची चाहूल लागली, परंतु धरतीच्या पोटात कित्येक शतके दडून बसलेल्या त्या भग्नावशेषांचे अजूनही प्रकाशात येण्याचे भाग्य जवळ आलेले नव्हते.

रेल्वे लाईन तयार झाली. जमिनीखालचे अवशेष जमिनीखालीच राहिले. परंतु त्यावेळी लागलेली चाहूल मात्र माणसातल्या संशोधक वृत्तीला, धडपडीला जागवून, हलवून राहिली होती.

१९२० साली अशाच दोघांचे कुतूहल वाढले. ते अस्वस्थ झाले आणि माधोस्वरूप वत्स व दयाराम साहनी या त्या दोघांनी हडप्पाच्या परिसरात उत्खनन आरंभिले.

जमिनीवरचे मातीचे थर हटू लागले. दगड-गोटे निघू लागले. आणि होता होता एक नगरीच नजरेत आली !

त्याच सुमारास आणखी एक चमत्कार घडला. भारतीय पुरातत्त्ववेत्ते डॉ. राखालदास बानर्जी यांनी हडप्पापासून सुमारे ४०० मैल अंतरावर सिंध प्रांतातील मोहोनजोदडो येथे उत्खनन सुरू केले होते. त्यात त्यांना एक बौद्ध स्तूप आढळला. त्यावरून तेथे आणखी काही बौद्ध धर्मासंबंधी सामग्री उपलब्ध होईल अशी त्यांना आशा वाटली व त्यांनी उत्खनन चालू ठेवले. परंतु बौद्ध अवशेष काही सापडले नाहीत. मात्र एक नगरीच्या नगरीच दृष्टीला पडली !

तिकडे मोहोनजदोडोपासून सुमारे ८० मैलांवर अर्नेस्ट मॅके यांनी उत्खनन केले आणि त्यांनाही १९२५ साली चन्हूदडो नावाची एक नगरी सापडली !

मातीच्या उदरात गडप झालेल्या या नगरांनी केवढ्या तरी विस्तीर्ण कालखंडाचे दर्शन घडवले, केवढा तरी दीर्घ इतिहास उपलब्ध करून दिला !

भारत प्राचीन देश असूनही प्राचीन पुराव्याच्या अभावी पाश्चिमात्य इतिहासकार त्याचे प्राचीनत्व मान्य करीत नसत. प्राचीन मूर्ती, मंदिरे, स्मारके, प्रासाद आदींचे भग्नावशेष जे आढळतात ते सुमारे बावीसशे–तेवीसशे वर्षांपूर्वीचे मौर्यकालातले आहेत; असे त्यांचे म्हणणे असे. याला

उत्तर एवढेच होते की, येथील नद्या आपले प्रवाह बदलतात. दर वर्षी नवीन गाळ आणतात. येथील उष्णता व पाऊस यापुढे दगड-विटांची कामे फार काळ टिकाव धरत नाहीत. ही कारणे बरोबर असली तरी इतर देशातही हीच स्थिती होती. तरीही दजलाफरात खोऱ्यात सुमेरियन बाबिलोनियन व असीरियन आदी संस्कृतींचा जन्म झाला व त्या विकासही पावल्या. नाईल नदीच्या खोऱ्यातच इजिप्तची प्राचीन संस्कृती उदय पावली.

हिंदुस्थानातही, याच प्रकारे, सिंधु नदीच्या खोऱ्यात एका महान संस्कृतीचा जन्म व उत्कर्ष झालेला होता. परंतु असे असूनही इजिप्त, इराकमध्ये चार ते सहा सहस्र वर्षांपूर्वीची स्मारके आढळतात. हिंदुस्थानात इतकी प्राचीन स्मारके आढळत नव्हती, पण मौर्यकाळातली उपलब्ध स्मारके कलेच्या दृष्टीने इतकी प्रगत होती की त्यांच्या मागे हजारो वर्षांच्या अनुभव होता हेही स्पष्ट होत होते. तेव्हा हे कसे, असे कोडेच शास्त्रज्ञांना होते; व त्यांनी शेवटी असे अनुमान काढले होते की, हिंदुस्थानच्या लोकांनी ही कला इराणी लोकांकडून शिकून घेतली असली पाहिजे.

हे अनुमान भारतीय मनाला बरे वाटले नाही, किंवा पटले नाही तरी त्याला समर्पक उत्तर हिंदुस्थानाजवळ नव्हते. पण अकस्मात मोहोनजदडो, हडप्पा, आदी नगरांनी मातीतून वर येऊन हे लांच्छन पुसून टाकले.

आता तज्ञांच्या मते, तेथे सापडलेले अवशेष व वस्तू सुमारे ४५०० ते ५५०० वर्षांपूर्वीच्या आहेत. त्यामुळे भारतीय संस्कृतीचा व कलेचा इतिहास आता कमीतकमी आणखी तीन-साडेतीन हजार वर्षांनी प्राचीन ठरतो. मोहोनजदडो व हडप्पा येथील कला एवढी प्रगत आहे की, तिच्यामागे निदान ५०० वर्षांचा अनुभव व साधना असली पाहिजे असे वाटते!

सिंधच्या हवामानात त्या काळापेक्षा आज पुष्कळच बदल झालेला

आहे. भौगोलिक रूपही बदलून गेले आहे. मोहोंजदडो आज समुद्रापासून १९० मैल अंतरावर आहे; पण त्याकाळी ते समुद्राच्या काठी असले पाहिजे, असे वाटते. हळूहळू सिंधूने गाळ टाकत टाकत एवढ्या दूर समुद्र हटविला. मोहोनजोदडोच्या उत्तरेस हडप्पा आहे. तेथे पूर्वी मोठी नदी वाहत असावी, असे अनुमान आहे. हल्ली मुल्तान जिल्ह्यामध्ये पाऊस फार कमी पडतो. पण दोन-अडीचशे वर्षांपूर्वी तिथे पाऊस फार पडत असे. सुमारे चारशे वर्षांपूर्वी सिंधमध्ये मोठी मेहरान नदी सिंधुसारखीच वाहत होती. आता ती फारच छोटी झाली आहे. सतलज आता बियास नदीला मिळते, पूर्वी ती मेहरान नदीला मिळत असे. हिची हकरा नावाची दुसरी शाखा तर पार आटून गेली आहे. या सर्वांवरून असे अनुमान निघते की, त्या काळी मोहोंजदडो व हडप्पा ही नगरे अत्यंत समृद्ध स्थितीत होती. त्या वेळी हा प्रदेशही आजच्याप्रमाणे मरुप्राय, रुक्ष नव्हता. आता तर तो पाकिस्तानातच गेला आहे.

मोहोंजदडो व हडप्पा ही नगरे त्यावेळी केवळ समृद्धच नव्हती, तर तिथली संस्कृतीही अत्यंत प्रगत अवस्थेत होती. सर जॉन मॉर्शल हे या उत्खननात एक प्रमुख तज्ज्ञ होते. त्यांनी नंतर अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला आहे. त्यात ते म्हणतात,

" मोहोंजदडो व हडप्पा येथे दोन्ही ठिकाणी एक गोष्ट अगदी स्पष्ट आणि निःसंदिग्धपणे आढळून येते ती ही, की या दोन्ही ठिकाणी व्यक्त होणारी सुधारणा व संस्कृती ही काही प्राथमिक अवस्थेतील किंवा बाल्यावस्थेतील संस्कृती नाही; तर ही संस्कृती कित्येक युगांची प्राचीन असून हिंदुस्थानात तर तिचा जणू एक प्रकारचा कायमचा ठसाच होऊन गेलेला आहे. तिच्या पाठीमागे कित्येक हजार वर्षांचे मानवी दीर्घ प्रयत्नांचे डोंगर उभे आहेत. अशा रीतीने यापुढे इराण, मेसापोटेमिया आणि ईजिप्त यांच्या बरोबरीने हिंदुस्थानचीही गणना, ज्या ठिकाणी मानवी

सुधारणेच्या कार्यक्रमांना प्रथम सुरुवात झाली व ज्या ठिकाणी त्यांची प्रथम वाढही झाली, अशा भूमीमध्ये केली पाहिजे.

" पंजाब आणि सिंधमध्ये आणि कदाचित हिंदुस्थानच्या इतर भागांमध्येही त्या काळी मेसापोटेमिया किंवा ईजिप्त यामध्ये नांदत असलेल्या सुधारणेसारखीच परंतु कित्येक बाबतीत तिच्याहून उच्च दर्जाची अशी अगदी पुढारलेली, सर्व ठिकाणी एकसारखी आणि स्वतःचीच स्वतंत्र अशी सुधारणा नांदत होती.

" काही अगदी थोडे प्रमुख मुद्दे सांगावयाचे म्हटले, तर त्या काळी कापसाचा कापडाच्या कामी उपयोग करण्याची कला केवळ हिंदुस्थानातच काय ती अस्तित्वात होती. आणि पश्चिमेकडील जगात तिचा प्रसार होण्याला त्यानंतर दोन तीन हजार वर्षे जावी लागली. त्याचप्रमाणे इतिहासपूर्वकाळच्या ईजिप्तमध्ये, मेसापोटेमियामध्ये किंवा पश्चिम आशियामध्ये अथवा इतर कोठेही आपल्याला मोहोंजदडोमधील नागरिकांच्या घरासारखी प्रशस्त व सोयिस्कर घरे किंवा तेथील सुंदर व मजबूत स्नानगृहांसारखी स्नानगृहे काही आढळून येत नाहीत. त्या देशांमध्ये देवांची विशाल व सुंदर मंदिरे किंवा राजांचे राजवाडे आणि थडगी बांधण्याकरता पुष्कळ पैसा उधळण्यात आलेला आढळतो; पण बाकीच्या लोकांना मात्र मातीच्या अगदीच भिकार निवासस्थानांवर संतुष्ट राहावे लागत असावे असे दिसते. सिंधु नदीच्या खोऱ्यात याच्या उलट प्रकार आढळतो. तेथे जी सुंदरात सुंदर श्रेष्ठ दर्जाची बांधकामे आढळतात ती सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठीच तयार केलेली आढळतात.

" तांबे किंवा ब्रांझ धातूच्या हत्यारांच्या आणि भांड्यांच्या जोडीलाच मातीची किंवा दगडाची भांडी आणि हत्यारे तत्कालीन लोक वापरीत होते.

" त्याचप्रमाणे सिंधूच्या खोऱ्यातील कला आणि धर्म हेही अगदी खास

स्वतंत्र ठशाचे आणि सिंधूच्या खोऱ्यातील इतर अनेक गोष्टींप्रमाणेच इतर जगापासून सर्वथा वेगळे आहेत. तत्कालीन इतर देशांमधील जे काही कलांचे नमुने आपल्याला माहीत आहेत त्यांमध्ये कोठेही, येथे जी मेंढा, कुत्रा किंवा इतर प्राणी यांची शाडूची किंवा चिनी मातीची चित्रे आढळतात, त्यांच्यातील हातोटीच्या तोडीची चित्रे आढळत नाहीत; किंवा निरनिराळ्या मुद्रांवर ज्या पद्धतीने कोरीवकाम किंवा नक्षीकाम आढळते, तशा तोडीचे कामही त्या इतर देशांत आढळत नाही. विशेषतः अशा कोरीव कामांचे किंवा चित्रांचे काही काही जे अत्युकृष्ट नमुने आहेत—उदाहरणार्थ, मोठ्या वशिंडाच्या व तोकड्या शिंगांच्या बैलाची चित्रे— त्यांमध्ये ज्या उच्च प्रकारचे उठाव निर्माण करण्याचे कौशल्य आणि अंगरचना व बांध्याच्या वळणाच्या रेषान् रेषासंबंधीची सूक्ष्म दृष्टी आढळते, तीहून उच्च प्रकारची दृष्टी कोरीवकामाच्या क्षेत्रात आजपर्यंत कोठेही आणि केव्हाही दिसून आलेली नाही. तसेच 'हडप्पा येथे सापडलेले जे दोन मनुष्यांच्या छोट्या पुतळ्यांचे नमुने आहेत, तशा तऱ्हेचे नमुने ग्रीक संस्कृतीच्या श्रेष्ठ काळात येऊन पोचेपर्यंत मध्ये इतरत्र दिसून येत नाहीत. सिंधूच्या खोऱ्यातील धर्मामध्ये अर्थातच इतर जगातील धर्मांशी समान अशा पुष्कळ गोष्टी दाखवता येतील. परंतु एकंदर साकल्याने विचार केला तर या काळचा धर्म इतका खास हिंदुस्थानचा असा वाटतो की, आज प्रचलित असलेल्या हिंदूधर्मा-हून तो कोणत्या बाबतीत वेगळा आहे हे दाखविणेसुद्धा कठीण आहे."

मोहोनजदडो याचा शाब्दिक अर्थ आहे 'प्रेतांची टेकडी'. मोहोन-जदडो व हडप्पा येथे सापडलेल्या संस्कृतीला 'सिंधु-संस्कृती' म्हणून ओळखले जाते. ही सिंधु-संस्कृती केवळ सिंधूच्या खोऱ्यापुरतीच मर्यादित नव्हती तर आजचा बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब, सिंध, काठे वाड, राजपुताना आणि गंगेच्या खोऱ्यातील उत्तर भागही समाविष्ट होता.

सिंधु-संस्कृतीचे जन्मदाते कोण होते, याविषयी मात्र मतभेद आहेत. काही विद्वानांचे असे मत आहे की, ऋग्वेदकालीन संस्कृती व सिंधु संस्कृती ही एकाच संस्कृतीची दोन रूपे असून दोन्हींचे जनक आर्य होते. पण हे मत बरोबर मानले जात नाही. कारण ऋग्वेदिक आर्य संस्कृती ही ग्राम व शेतीप्रधान होती, तर सिंधुसंस्कृती नागरी व व्यापारप्रधान होती. आर्य मूर्तिपूजक नव्हते, पण सिंधु-संस्कृतीतले निवासी मूर्तिपूजक होते. त्यांच्या देवदेवतांच्या अनेक मूर्ती उत्खननात सापडल्या आहेत. आर्यकाली शिवपूजा व मातृदेवीची पूजा विशेष प्रचलित नव्हती, सिंधु-संस्कृतीच्या काळी ती फारच लोकप्रिय होती. आर्यांत अग्निपूजा होती, प्रत्येकाच्या घरी अग्निकुंड असे, सिंधु-संस्कृतीत ते आढळत नाही. युद्धाचे वेळी आर्य योद्धे ढाल, कवच आणि शिरस्त्राण धारण करत असत; परंतु सिंधु निवासी योद्धयांना ह्या गोष्टी ठाऊकच नव्हत्या असे दिसते. तसेच आर्यांच्या जीवनात घोड्याला विशेष महत्त्व होते. अश्वारूढ होऊन ते युद्ध करत असत. परंतु सिंधु-रहिवाश्यांना घोडा व घोड्याचा उपयोग ठाऊक नसावा. आर्यांच्या दृष्टीने गाय पूजनीय व महत्त्वाची होती. सिंधुनिवासियांना बैल अधिक महत्त्वाचा वाटत होता.

अशा या भिन्नतेवरून सिंधुसंस्कृती ही वेगळी व स्वतंत्र होती असेच अनुमान निघते.

सिंधुसंस्कृती ही शांतीमूलक होती त्यामुळेच युद्धोपयोगी साहित्य अभावाने सापडले आहे. युद्धपिपासा नसल्यामुळे व शांतीचा काळ लाभल्यामुळेच मोटमोठ्या नगरांची उभारणी झाली असावी. तत्कालीन नगरयोजना शास्त्रशुद्ध होती. मोठे प्रशस्त रस्ते, सांडपाण्यासाठी गटारे, सार्वजनिक स्नानगृहे, नगररक्षक व पूरनियंत्रक तटबंदी, केरकचरा साठवण्याची व्यवस्था. पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी, बाजाराची व्यवस्था आदींचा समावेश या नगररचनेत होता.

नगर-रचनेप्रमाणेच गृहरचनाही व्यवस्थित, सर्व सोर्यांनी युक्त, पक्क्या विटांच्या व दगडाच्या बांधणीची होती.

शेती, पशूपालन, सूतकताई व वस्त्र-उत्पादन, व्यापार आदी व्यवसाय त्या काळी होते.

पक्षीपालन, शिकार, कोंबड्यांची झुंज, शतरंज, संगीत, नृत्य आदी-द्वारा मनोविनोदनही ते करीत असत.

तत्कालीन समाज विद्वान, योद्धा, व्यापारी व श्रमजीवी अशा चार वर्गात विभागलेला होता.

मूर्तिपूजेप्रमाणेच लिंगपूजा, जलपूजा, प्रतीकपूजा, वृक्षपूजा, पशूपूजा रूढ होती.

कुंभारकाम, सोनारकाम, धातूची व मातीची भांडी बनवणे इत्यादी कलांप्रमाणेच मुद्रा बनविणे, मूर्तीकला, स्थापत्य, खेळणी बनवणे आदी कलांची चांगली माहिती होती.

लेखनकलाही तत्कालीन लोकांना अवगत होती असे मुद्रांवरून दिसते. पण मुद्रांवरील सिंधु-लिपी अद्याप वाचता आलेली नसल्यामुळे कितीतरी गोष्टी अनिर्णित स्वरूपात राहिलेल्या आहेत.

सिंधु-संस्कृतीच्या काळी शासन कोण्या एका राजाच्या हातात नव्हते. जनतेच्या प्रतिनिधींच्या हाती सत्ता होती. सत्तेचे विकेंद्रीकरण केलेले होते. समाजजीवन समष्टिगत होते. नगरे एवढी मोठी व सोयींनी युक्त होती, त्यावरून त्यांची सफाई, आदी व्यवस्थेसाठी नगरपालिकेसारखी नागरिकांच्या प्रतिनिधींची यंत्रणा असावी. संरक्षणासाठी रक्षक होतेच. अशी ही उन्नत अवस्थेतील सिंधु-संस्कृती प्राचीन भारताच्या इतिहासातील अभिमान बिंदू आहे.

□

## ‘ कृणुध्वम् विश्वमार्य्यम् ’

‘ सारे विश्व आर्यमय करून सोडा ! ’ अशी आर्यांची महत्त्वाकांक्षी घोषणा आहे. या घोषणेवरूनही आर्यांच्या स्वभाव–प्रकृतीची कल्पना येते. आर्य चांगले मजबूत, दणकट व लढवय्ये लोक होते. ते जिथे, जिथे गेले तिथे, तिथे त्यांनी मूळच्या लोकांवर आक्रमण केले व आपण त्या प्रदेशाचे स्वामी बनले.

हिंदुस्थानातही हेच घडले. वायव्येकडून हे लोक सुमारे ३५०० ते ४००० वर्षांपूर्वी येथे आले असा विद्वानांचा एक तर्क आहे. पण ते आले ते आक्रमकाच्या आविर्भावातच प्रकटले. ते एखाद्या प्रवाशासारखे ही भूमी पाहायला म्हणून किंवा लुटून न्यायला म्हणूनही आले नव्हते. ते आले ते येथे राहाण्यासाठी, येथेच वस्ती करण्यासाठी व मग त्यासाठी जरूर पडल्यास लढण्यासाठीही आले होते.

आर्यांच्या पूर्वी हिंदुस्थानात द्रविड आदी लोक येऊन स्थायिक झाले

होते. ते आर्यांच्या आधीचे रहिवासी म्हणून त्यांना ‘ अनार्य ’ म्हणायचे. ‘ आर्य ’ याचा अर्थ ‘ श्रेष्ठ ’, ‘ उत्तम ’, ‘ सभ्य ’ असा होतो. हिंदुस्थानातील मूळ रहिवाश्यांपेक्षा आपला उच्चभ्रूपणा व श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या उद्देशानेच या लोकांनी स्वतःला ‘ आर्य ’ म्हणवून घेतले आणि येथल्या जिंकून घेतलेल्या मूळच्या लोकांना ‘ दस्यु ’ किंवा ‘ दास ’ म्हणून संबोधिले.

हे आर्य आले कोठून, यांचा आदि देश कोणता, याविषयी विविध तर्क असून अद्यापही विद्वानांत त्याबद्दल मतभेद आहेत. आर्यांच्या मूळ स्थानाचा शोध लावण्यासाठी विद्वानांनी इतिहास, भाषाशास्त्र, पुरातत्त्व, शरीररचना-शास्त्र आणि शब्दार्थ-विकास शास्त्र अशा या पाच शास्त्रांचा आधार घेतला आहे.

या विद्वानांत प्रामुख्याने दोन मते आहेत. काहींच्या मते आर्य लोक हिंदुस्थानात बाहेरून आलेले आहेत, हे एक मत व दुसरे म्हणजे आर्य हे मूळचे हिंदुस्थानातलेच आहेत !

आर्य बाहेरून आले म्हणजे कोठून आले याविषयी पुन्हा अनेक मते आहेत. काहींच्या मतानुसार आर्य हे मूळचे युरोप खंडातले रहिवासी असून डॉ. पी. गाइल्स यांच्या दृष्टीने ते हंगेरी भागातले आहेत तर पेन्का यांच्या मताने ते जर्मन प्रदेशातले आहेत.

आर्यांचा आदि-देश युरोप मानणारे संशोधक भाषाशास्त्राचा आधार घेतात. फ्लोरेन्सचा फिलिप्पा सॅसेटी नावाचा प्रवासी व्यापारी पाच वर्षे गोव्यात राहिला होता. त्याने येथे राहून संस्कृत भाषेचे अध्ययन केले. युरोपातील पुष्कळशा भाषांचे ज्ञान त्याला होतेच. या अध्ययनावरून त्याने असे मत प्रकट केले की, हिंदुस्थानातली संस्कृत भाषा व युरोपातील भाषा यांच्यांत साम्य आहे. सॅसेटीच्या या मताचा आधार घेऊन पुढे काही विद्वानांनी आर्यांचा आदिदेश युरोप ठरविला. बंगालचे मुख्य न्यायाधीश

सर विल्यम जोन्स यांनीही सॅसेटीच्या मताचे समर्थन करणारा प्रबंध १७८६ मध्ये ' एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल ' या संस्थेत वाचला. त्या प्रबंधात त्यांनी आर्यांच्या भिन्न भिन्न शाखांमधील भाषेतील शब्द समान असून त्यात कालमानानुसार फरक पडत गेला असे दाखवून दिले आहे. संस्कृतमधील ' पितृ ' शब्द घेतला तर त्याच्याशी लॅटिनमध्ये ' पेतर ', ग्रीकमध्ये ' पतेर ', जेन्दमध्ये ' पैतर ', केल्टमध्ये ' आर्थर ' गॉथिकमध्ये ' फदर ', तोरवारियन भाषेत ' वतर ' आणि इंग्रजीमध्ये ' फादर ' असे मिळते जुळते शब्द मिळतात.

संस्कृतमधील ' द्वौ ' —दोन या शब्दाशी लॅटिन ' दुआ ', आयरिश ' दौ ', गॉथिक ' त्वपृ ', लुथियानियन ' दु ' व इंग्रजी ' टू ' हे शब्द कितीतरी निकटचे दिसतात.

या भाषासाम्यावर आधारलेल्या तर्कावरून आर्यांची आदिभूमी युरोप होती, त्यातही लुथियानियन भाषेव्यतिरिक्त बाकीच्या भाषांमध्ये परिवर्तने घडलेली असल्याने लुथियानियन भाषेचा प्रदेशच आर्यभूमी होती असा आणखी एक तर्क विद्वानांनी काढलेला आहे. परंतु भाषा-साम्यामुळे केवळ असा तर्क करणे अन्य विद्वानांना मान्य नाही. अन्य कारणांमुळेही भाषा-साम्य घडून येऊ शकते.

युक्राइन प्रदेशात सापडलेल्या भांड्याच्या आधारावर नेहरिंग नामक एका संशोधकाने दक्षिण रशिया ही आर्यभूमी असावी असा तर्क केलेला आहे.

बऱ्याच विद्वानांना मध्य आशिया हा आर्यांचा आदिदेश असावा असे वाटते. धार्मिक ग्रंथांचा या मताला ते आधार घेतात. वेद आणि अवेस्ता यावरून आर्य संस्कृतीचा बोध होतो; त्यावरून वेदभूमी हिंदुस्थान व अवेस्ताभूमी इराण यांच्याजवळच आर्यस्थान असले पाहिजे असे ते मानतात.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी 'दि आर्क्टिक होम इन दि वेदाज' नावाचा जो ग्रंथ लिहिला आहे, त्यात त्यांनी म्हटले आहे की, कोण्या एका काळी उत्तर ध्रुवाजवळील पृथ्वीचा भाग मनुष्य वस्ती करण्यास सर्वथैव योग्य होता; व आर्यांचे मूलस्थान तिथेच होते. परंतु जेव्हा तिथे बर्फाचा व थंडीचा प्रकोप वाढला तेव्हा तिथे राहणे अशक्य झाले आणि आर्य लोकांना तिथून आपली वस्ती हलवावी लागली. मग आर्यांच्या काही टोळ्या युरोपमध्ये जाऊन वसल्या, काही इराणमध्ये वसल्या, तर काही हिंदुस्थानात येऊन राहिल्या. टिळकांनी वैदिक संस्कृतीची प्राचीनताही सुमारे दहा हजार वर्षांइतकी जुनी पुराणी मानली आहे.

डॉ. अविनाशचंद्र दास नावाच्या विद्वानांनी तर, हिंदुस्थानातील 'सप्तसैन्धव' प्रदेश हीच आर्यांची मूळभूमी आहे, असे मत प्रतिपादिले आहे. त्यांनी या प्रश्नावर अभ्यास करून 'ऋग्वेदिक इंडिया' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी आर्य लोक हे हिंदुस्थानातीलच मूळ निवासी आहेत हे मत मांडून त्याच्या पुष्ट्यर्थ भूगर्भशास्त्रातील सिद्धान्त प्रस्तुत केले आहेत.

डॉ. संपूर्णानंद नावाच्या पंडितांनी आपल्या 'आर्यो का आदिदेश' नामक ग्रंथातही 'आर्य सप्तसिन्धवाचे रहिवासी आहेत' असे म्हटले आहे.

'सप्तसिन्धव' म्हणजे सात नद्यांच्या जवळील प्रदेश. या प्रदेशातून सिंधु, विपासा (व्यास), शुतुद्रि किंवा शतद्रु (सतलज), वितस्ता (झेलम), असिक्नी (चिनाव), पऋष्णी (रावी) व सरस्वती या सात नद्या वहात होत्या. या सप्तसिन्धव देशातच प्रारंभी आर्य राहात होते. कालान्तराने त्यांच्यात धार्मिक मतभेद उत्पन्न झाले. आर्यांतील एक वर्ग देवाचा उपासक बनला, तर दुसरा वर्ग असुरांची उपासना करू लागला. दोन्ही पक्षात भयंकर युद्ध झाले. वैदिक साहित्यामध्ये ते

' देवासुर-संग्राम ' नावाने ओळखले जाते. या युद्धात असुर-उपासकांचा पराभव झाला व ते सप्तसिंध देशाचा त्याग करून पश्चिमेकडे गेले व इराणमध्ये जाऊन बसले पारसी लोकांचा प्राचीन ग्रंथ ' जेन्द अवेस्ता ' आहे; त्यात ' अहुरमज्दा ' म्हणजे असुर मेधाली, या देवतेचे वर्णन आहे.

' देव ' शब्द ' दिव ' धातूपासून निघाला आहे. दिव याचा अर्थ आहे चमकणे. म्हणून जो चमकणारा, प्रकाशमान आहे तो देव आहे. इंद्र, वरुण, अग्नि, सूर्य आदींना हा ' देव ' शब्द वापरलेला आहे. ' असुवाला' तो असुर; म्हणजे जो बलवान आहे, ज्याच्यात प्राणशक्ती भरपूर आहे तो. असुर शब्दही त्यावेळी देवांनाच वापरला जाई. परंतु पुढे व्यवहारात त्याचा अर्थ बदलला. ऋग्वेद-काळातच हळूहळू इंद्रादीसाठी देव व त्यांच्या बलवान शत्रूसाठी, दैत्यांसाठी असुर शब्द वापरला जाऊ लागला. त्यानंतर देव आणि असुर अशीच शब्दयोजना झाली. सामान्य हिंदूंची आजही अशीच धारणा आहे की जो ' सुर ' म्हणजे ' देव ' नाही तो ' असुर ' आहे.

भारतातील ' ब्रह्मर्षी देश ' हे आर्यांचे मूलस्थान असावे असा एक तर्क आहे, तर ते ' मध्यप्रदेश ' किंवा ' काश्मीर ' अथवा हिमालय असावे असेही तर्क आहेत. मुल्तानमधून देविका नावाची नदी वाहते. देविका नदीच्या निकटच्या प्रदेशातच आर्यांची मूळ वस्ती होती असाही एक तर्क आहे.

आर्यांच्या मूळ वसनीस्थानाविषयी अशी निरनिराळी मतमतांतरे आहेत.

आर्यांबद्दल पं. जवाहरलाल नेहरू यांनी आपली कन्या प्रियदर्शिनी इंदिरा हिला तिच्या बालपणी तुरुंगातून लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे—

" द्रविड लोकांवर आर्य लोकांनी प्राचीन काळी उत्तरेकडून स्वारी केली. तेव्हा मध्य आशियात ह्या आर्य लोकांची वस्ती बेसुमार वाढली

असावी असे वाटते. ह्या सर्व लोकवस्तीला तेथे अन्न पुरेनासे झाल्यामुळे त्यांतील लोक पोटासाठी इतर देशांकडे पसरू लागले. त्यांच्या मोठमोठ्या टोळ्या पश्चिमेकडे इराणात व तेथून थेट ग्रीस व युरोपातील देशात देखील गेल्या. त्याचप्रमाणे त्यांच्या दुसऱ्या टोळ्या काश्मीरच्या पठारावरून खाली हिंदुस्थानातही उतरल्या. त्यांनी तेथील मूळच्या रहिवाश्यांचा पराभव केला व ते त्यांना खाली रेटीत रेटीत चालले. ह्याप्रमाणे आर्य लोकांच्या लाटांवर लाटा वायव्येकडून हिंदुस्थानवर आदळल्या असाव्यात. कदाचित सुरुवातीला द्रविड लोकांनी त्यांना तात्पुरते थोपवून धरले असेल. पण जेव्हा आर्यांच्या झुंडीच्या झुंडी येऊन थडकू लागल्या, तेव्हा त्यांना रोखून धरणे द्रविडांना अशक्य झाले असावे. ह्यानंतर बराच काळपर्यंत आर्य लोक फक्त उत्तरेत म्हणजे अफगाणिस्थानात व पंजाबात राहिले. मग ते आणखी खाली आले, व जेथे हल्ली आपण राहतो, व ज्या प्रदेशाला 'संयुक्त-प्रांत' (आजचा उत्तर प्रदेश) असे नाव आहे, तेथे येऊन त्यांनी वस्ती केली. ह्यापुढेही त्यांचा प्रसार खुंटला नाही. येथून ते थेट मध्य हिंदुस्थानातील विंध्य पर्वतापर्यंत आले व त्यांनी तो सर्व प्रदेश व्यापला. पण विंध्यपर्वत ओलांडणे मात्र त्यांना कठीण झाले. कारण तेथे अतिशय दाट अरण्ये पसरलेली होती. म्हणून पुष्कळ काळपर्यंत आर्य लोक विंध्यपर्वताच्या उत्तरेकडील भागातच राहिले. पुढे त्यांच्यापैकी बऱ्याचजणांनी विंध्य पर्वतही ओलांडून दक्षिणेत प्रवेश केला. पण पूर्वीप्रमाणे त्यांच्या मोठमोठ्या टोळ्या मात्र खाली जाऊ शकल्या नाहीत. त्यामुळे हिंदुस्थानचा दक्षिण भाग विशेषकरून द्रविड लोकांचाच राहिला.

"इंदिरे! आर्य लोकांच्या हिंदुस्थानातील आगमनाचा अभ्यास करणे अतिशय मनोरंजक आहे. त्यांच्याविषयीची पुष्कळशी माहिती आपल्याला जुन्या संस्कृत ग्रंथांतून वाचावयास मिळते. त्यांच्यापैकी वेदांसारखे काही

ग्रंथ याच सुमारास लिहिले गेले असावेत. वेदांपैकी सर्वांत जुना ‘ ऋग्वेद. त्याच्यातील वर्णनावरून त्यावेळी हिंदुस्थानचा कोणता भाग आर्यांनी आक्रमण केला होता त्याची कल्पना करता येते. त्याशिवाय दुसरे वेद आणि पुराणांसारखे इतर जुने संस्कृत ग्रंथ ह्यांमध्ये आर्यांनी हिंदुस्थानात आपला प्रसार कसकसा केला, ह्याची माहिती आपल्याला मिळते... ह्या ग्रंथांवरून असे दिसते की, आर्य लोक अफगाणिस्थान आणि पंजाबात राहात होते; तेव्हा त्या भागाला ते ‘ ब्रम्हावर्त ’ असे म्हणत. त्या वेळी अफगाणिस्थानला ‘ गांधार ’ असे नाव होते. महाभारतातील गांधारी तुला आठवते का ? ती गांधार किंवा अफगाणिस्थानातून आली असल्यामुळे तिचे हे नाव होते. हल्ली अफगाणिस्थान हा हिंदुस्थानापासून निराळा देश आहे; पण त्या काळी हे दोन्ही देश एकाच देशात अंतर्भूत होते.

“ जेव्हा आर्य लोक आणखी खाली येऊन गंगा-यमुनांच्या मैदानात राहू लागले, तेव्हा सर्व उत्तर हिंदुस्थानला त्यांनी ‘ आर्यावर्त ’ असे नाव दिले.

“ इंदिरे ! आर्य लोक हिंदुस्थानात सुमारे पाच सहा हजार वर्षांपूर्वी किंवा कदाचित त्यांच्याही अगोदर आले असले पाहिजेत, अर्थातच ते सर्व एकदम व एकाच टोळीत येथे आले नाहीत. सैन्यामागून सैन्य, टोळीमागून टोळी, एका मागून दुसरे कुटुंब ह्या क्रमाने शेकडो वर्षांपर्यंत ते सारखे ह्या देशात येत राहिले असावेत. आपले घराऊ सामानसुमान खटाऱ्यातून किंवा ओझ्याच्या जनावरांच्या पाठीवर लादून आर्य लोकांचे तांडेच्या तांडे आपल्या बायकामुलांसकट एकामागून एक प्रवास करीत येत होते ह्याची कल्पना कर पाहू !.. तुला मागे सांगितल्याप्रमाणें त्यांच्यापैकी बहुतेक लोक वायव्येकडील पर्वतातून हिंदुस्थानात शिरले.पण कदाचित काहीजण इराणच्या आखातातून समुद्रमार्गाने येऊन आपल्या लहान लहान जहाजांतून सिंधू नदीच्या पात्रातून वर शिरले असावेत.

“हे आर्य लोक कसे होते? त्यांच्याविषयी बरीच माहिती त्यांनीच लिहिलेल्या पुस्तकांवरून आपल्याला सापडते. त्यांच्यापैकी वेदांसारखे काही ग्रंथ जगातील सर्वांत जुने ग्रंथ आहेत. बहुधा सुरुवातीला ते ग्रंथ लिहिलेले नसावेत. वेदांमधील भाग तोंडपाठ करून त्यावेळचे लोक ते वारंवार म्हणत व दुसऱ्यांना त्यांची तोंडी संथा देत. पण पुढे ते वेद संस्कृत भाषेत लिहिले गेले. ती संस्कृत भाषा इतकी रसाळ व सुंदर आहे की, ती आपण चांगल्या सुरात गाऊ देखील शकतो. संस्कृत जाणणारा व गोड गळ्याचा एखादा मनुष्य जर वेदघोष करू लागला तर ऐकणारा अगदी प्रसन्न होऊन त्याची वृत्ती तल्लीन होऊन जाते. हिंदू लोक वेदांना अत्यंत पूज्य ग्रंथ मानतात. ह्या ‘वेद’ शब्दाचा अर्थ तरी काय आहे? तर वेद म्हणजे ज्ञान; आणि ह्या वेदांमध्ये त्या काळचे अत्यंत ज्ञानी असे जे ऋषी व मुनी ह्यांनी मिळविलेले सर्व ज्ञानभांडार साठवून ठेवलेले आहे. त्याकाळी त्यांच्यामध्ये आगगाड्या, तारायंत्रे किंवा चित्रपट नव्हते; पण म्हणून ते अडाणी लोक होते असे मुळीच नाही. काही लोकांचे असे मत आहे की, प्राचीन काळचे शहाणे लोक आजच्या कोणत्याही शहाण्या व सुधारलेल्या माणसांपेक्षा जास्त सूज्ञ होते. पण ते जास्त शहाणे होते की नव्हते हा मुद्दा बाजूला ठेवला तरी त्यांनी अत्यंत तेजस्वी ग्रंथ लिहिले आणि आजदेखील जिकडे तिकडे त्यांची वाहवा होत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ह्या गोष्टीवरूनच प्राचीन काळचे लोक हे किती श्रेष्ठ दर्जाचे असले पाहिजेत हे सहज सिद्ध होते.

“मी आताच म्हटल्याप्रमाणे हे वेद सुरुवातीला लिहिलेले नव्हते. ते ध्यानात ठेवून एका पिढीमागून दुसऱ्या पिढीला तोंडीच शिकविले जात. खरोखर, जुन्या काळातील लोकांची स्मरणशक्ती कमालीची दांडगी असली पाहिजे. आज आपल्यापैकी कितीजण संबंध पुस्तकेच्या पुस्तके तोंडपाठ करू शकतात, सांग पाहू?

" ज्या काळामध्ये वेद लिहिले गेले त्या काळाला 'वैदिक काळ' असे नाव आहे. अगदी पहिला वेद म्हणजे ऋग्वेद. प्राचीन आर्य नेहमी गात असलेल्या स्तोत्रांनी आणि पद्यांनी तो भरलेला आहे. हे आर्य अतिशय आनंदी स्वभावाचे लोक असावेत. त्यांना निराशा व खिन्नता यांचा गंधही नसून त्यांची अंतःकरणे अत्यंत प्रसन्न आणि वीर्यशाली असावीत. अशा आनंदी आणि प्रसन्न मनोवृत्तीमध्ये त्यांनी सुंदर कवने रचिली असावीत आणि आपल्या आराध्य दैवतापुढे ती गायिली असावीत.

" आर्य लोकांना स्वतःचा व आपल्या जातीचा अत्यंत अभिमान असे. खुद्द 'आर्य' शब्दाचा अर्थ 'सभ्य गृहस्थ' किंवा वरिष्ठ दर्जाचा मनुष्य असा आहे. त्यांना स्वातंत्र्याची फार आवड असे. आपल्या पूर्वजांना, म्हणजे प्राचीन आर्यांना अपमान आणि गुलामगिरीपेक्षा प्रत्यक्ष मृत्यूला कवटाळणे अधिक श्रेयस्कर वाटे!

" आर्य लोक उत्कृष्ट लढवय्ये होते व त्यांना निरनिराळ्या शास्त्रांची थोडीबहुत व कृषिशास्त्राची तर पुष्कळच चांगली माहिती होती. शेती-विषयी त्यांना फार महत्त्व वाटे, आणि म्हणून शेतीला उपयोगी पडणाऱ्या प्रत्येक वस्तूला ते फार किंमत देत. मोठमोठ्या नद्या त्यांच्या जमिनींना पाणी पुरवीत म्हणून ते नद्यांना पूज्य मानीत आणि त्यांना खऱ्या उप-कारकर्त्याप्रमाणे मान देत. बैल आणि गाय ह्या दोघांचा त्यांना शेतीसाठी व रोजच्या गृहकृत्यात पुष्कळ उपयोग होई. गाय दूध देत असल्यामुळे तिला ते फार पवित्र मानीत. ह्या कारणांमुळे ते ह्या जनावरांची चांगली निगा राखीत व त्यांची गुणवर्णने गात. पुढे बऱ्याच काळानंतर गाईच्या महत्त्वाचे कारण लोक विसरले व तिला देवता समजून तिची पूजा-अर्चा करू लागले.

" आर्य लोकांना स्वतःचा फार अभिमान असल्यामुळे पुढे मागे आपण हिंदुस्थानातील जुन्या व मागासलेल्या रहिवाशांमध्ये मिसळून जाऊ अशी

त्यांना भीती वाटू लागली व असे मिश्रण होऊ नये म्हणून त्यांनी अनेक नियम व कायदे काढले. त्याअन्वये आर्यांना इतर लोकांशी विवाह करता येत नसे. पण पुढे असे मिश्रविवाह झालेच; व त्यामुळे ज्याला आपण आज जातिभेद म्हणतो त्याचा प्रारंभ झाला. हल्ली हे जातिभेद कमालीचे वाढून ते निव्वळ हास्यास्पद झाले आहेत! काही लोक दुसऱ्यांना नुसता स्पर्श करण्यास कचरतात किंवा त्यांच्याबरोबर जेवणखाण करण्यास भितात. पण सुदैवाने ही स्थिती आता पालटत चालली आहे."

आर्य शब्द विशिष्ट मानववंश समूह या अर्थी जसा वापरला जातो तसाच भाषावंशवाचक म्हणूनही वापरला जातो. अनेक भाषाशास्त्रज्ञांनी 'आर्यन' हा शब्द अनेक अर्थांनी वापरला आहे. मॅक्समुल्लर यांनी तो इंडो-जर्मन याचा समानार्थक म्हणून वापरला असून त्या भाषा बोलणारांना त्यांनी 'आर्यन' म्हटले आहे. 'इरा' म्हणजे 'पृथ्वी'. आर्य शब्दाची व्युत्पत्ती त्यांनी 'इरा' हा मूळ शब्द मानली आहे. ज्ञानकोशकार केतकर 'ॲरियो' हा शब्द 'आर्य' शब्दाचे मूळ मानतात.

आर्यांच्या भिन्न भिन्न शाखा आपले वेगळेपण दाखविण्यासाठीही वेगवेगळा शब्दप्रयोग करतात. 'इंडो-जर्मन' प्रमाणेच इराणी आर्यांपासून भिन्नत्व दाखविण्यासाठी भारतीय आर्यांना 'इंडो-आर्यन' म्हणतात. आर्य हिंदुस्थानात बाहेरून आले की मूळचे इथलेच याविषयी जरी मतभेद असले तरी ते 'सप्तसिंधव' म्हणजे 'पंजाब-काश्मीर' च्या प्रदेशात प्रारंभी राहात होते असे बहुतेक शास्त्रज्ञ मानतात. या लोकांनाच 'वैदिक आर्य' म्हणतात. यांनीच ऋग्वेदाची रचना केली. ऋग्वेदातली पुष्कळशी सूक्ते पंजाबमध्येच निर्माण झाली आहेत. या प्रदेशालाच ते 'देवकृतयोनि' -ईश्वरनिर्मित देश असे मानत असत. या प्रदेशातील पहाड, भूमी,

नद्या, निसर्ग आर्यांना अत्यंत प्रिय होते.

येथेच त्यांच्या संस्कृतीचा उदय व विकास झाला.

येथेच त्यांचा अभ्युदय झाला.

आणि येथेच त्यांना निःश्रेयसाची दीक्षा मिळाली !

'आर्य' शब्दावरून आर्य-धर्म, आर्य-संस्कृती इत्यादी कल्पना व आशय मनात जागृत होतो आणि आपल्या आर्यत्वाविषयी एक प्रकारचा सार्थ अभिमानही वाटू लागतो. एक कवी म्हणतो :

हम आर्य है, हमारा इतिहास है पुराना ।
है सूर्यध्वज हमारा, किरणे असंख्य नाना ॥


प्रातःसवनमें हमने, त्रिज्ञान-वेद पाया ।
जिसकी विभा-प्रभासे संसार जगमगाया ॥

शोभा है विश्वकी हम, हम देवके दुलारे ।
वसु है वसुंधराके, हम हैं गगनके तारे ॥

संसार को हमारा गौरव गुमान भाया ।
सद्धर्म सभ्यताका हमसे विधान पाया ॥

अपने अतीतको अब हम वर्तमान कर दें ।
हम फिर दयासे जगमें, आनन्द-ज्ञान भर दें ॥

□



# सर्वं आनंदमयं

आर्य सभ्य होते. मन–बुद्धीने प्रगल्भ होते. निसर्गाशी झगडावे लागल्यामुळे, संकटांशी मुकाबला करताना वारंवार स्थलांतर करावे लागल्यामुळे असेल किंवा अन्य मानवसमूहांशी संपर्क आल्यामुळे असेल पण आर्यजनांना शहाणपणाचा, सभ्यतेचा लाभ झालेला होता हे खरेच !

पृथ्वीच्या पाठीवर इतिहासाच्या प्रभातकाळी जे मानववंश नांदत होते, त्यांत 'आर्यवंश' प्रमुख व खानदानी मानला जात असे. आर्य स्वतःला सुसंस्कृत व प्रतिष्ठित समजत असत. त्यांनी आपली एक संस्कृती निर्माण केली, धर्मही उत्पन्न केला. आर्य–संस्कृती व आर्य-धर्म ही आर्यांच्या प्रगल्भतेचीच साक्ष आहे.

आर्य प्रारंभी निसर्गपूजकच होते. आपल्या अवतीभवती पसरलेल्या निसर्गातील नाना रहस्यांविषयी आदिमानवापासूनच एक प्रकारचे विलक्षण गूढ माणसाच्या मनात वसत आलेले आहे. या गूढ वाटणाऱ्या गोष्टींनाच

मग माणसाने देवत्व दिले. त्यांवर कथा-कहाण्या रचल्या. काव्ये केली. आर्यांनीदेखील अशी काव्यरचना विपुल केलेली आहे. निसर्गावर आर्यांचे प्रेमही होते आणि भक्तीही होती. या प्रेमभक्तीतूनच त्यांच्या ठायीची कवित्वशक्ती उचंबळून आली आणि त्यांनी अनेक निसर्गवर्णन करणारी सूक्ते लिहिली. आर्यांची ही निसर्गकविता अत्यंत सुंदर व आल्हादक अशी आहे.

आर्यांच्या संवेदनशील अशा सौंदर्यवेधी मनाचीही साक्ष या सूक्तांवरून पटते.

आर्यांनी रचलेल्या ' ऋग्वेद ' ग्रंथात अशी सूक्ते आहेत. उषा या देवतेचे स्तवन करणारी वीस सूक्ते आर्य ऋषींनी रचलेली आहेत. रात्रीचा काळोख संपून नवा दिवस उषेच्या आगमनावरोबर अवतरतो ही सृष्टीचक्रातली नित्य-नेमेचि घडणारी घटना. पण या उषःकालाला ऋषीने देवत्व दिले आणि म्हटले :

उपो भद्रेभिरा गहि दिवश्चिद् रोचनादधि ।
वहन्त्वरुणप्सव उप त्वा सोमिनो गृहम्

सुपेशसं सुखं रथं यमध्यस्था उषस्त्वम् ।
तेना सुश्रवसं जनं प्रावाद्य दुहितर्दिवः

वयश्चित् ते पतत्रिणो द्विपच्चतुष्पदर्जुनि ।
उषः प्रारन्नृतूँरनु दिवो अन्तेभ्यस्परि

व्युच्छन्ती हि रश्मिभिर्विश्वमाभासि रोचनम् ।
तां त्वामुषर्वसूयवो गीर्भिः कण्वा अहूषत

—हे उषे ! झळझळत्या अशा दिगंतसीमान्तावरून तू तुझ्या मंगल अशा अश्वांसह यावेस ! अरुणाच्या वर्णासारखे तुझे हे अश्व सोमयागी गृहस्थाच्या निवासाकडे तुला नेतील.

हे दिगन्तकन्ये उषे! ज्या रथावर तू प्रतिष्ठित झालेली आहेस तो नयनमनोहर सुंदर व सुखदायी आहे. हे देवी, तुझी स्तुतीस्तोत्रे गाणाऱ्या जनलोकांना तू अभयदान दे!

हे देदिप्यमान उषे! तुझ्या आगमनाच्या नियत समयी आकाशातून भिरभिरणारे पक्षी, भूमीवर संचार करणारी माणसे व पशू हे देखील दिगंत –सीमान्ताच्या दाही दिशांतून हालचाल करू लागतात.

हे देवी! तुझ्या लखलखत्या किरणांनी तू उजळत येतेस आणि सारे क्षितिज–आसमंत प्रकाशमान करून टाकतेस.

हे उषे! धनधान्यांची आकांक्षा बाळगणारे आम्ही ही स्तुतीस्तोत्रे गाऊन तुला आवाहन करीत आहोत.

उषःकालावर–उषेवर–ती लावण्यवती स्त्री आहे असे कल्पून सुंदर सूक्ते आर्यऋषींनी रचलेली आहेत :

प्रति ष्या सूनरी जनी व्युच्छन्ती परि स्वसुः ।
दिवो अदर्शि दुहिता ॥

–ही लावण्यवती रमणी, ही आकाशकन्या उषा पाहा. सुप्रकाशित होऊन ही आपल्या भगिनीच्या पाठोपाठ नजरेत आली.

अधि पेशांसि वपते नृतूरिवा—
पोर्णुते वक्ष उस्त्रेव बर्जहम् ।
ज्योतिर्विश्वस्मै भुवनाय कृण्वती
गावो न व्रजं व्युषा आवर्तमः ॥

—ज्याप्रमाणे एखादी नटी निरनिराळे वेष धारण करते, त्याप्रमाणे ही उषा निरनिराळी रूपे घेऊन येते. धेनू जशी आपली कास सत्रांच्या दृष्टीस पडू देते, त्याप्रमाणे ही उषा आपला वक्षप्रदेश अनावृत ठेवते.

सर्व जगाला प्रकाश देणाऱ्या या उषेने, गायी आपला गोठा सोडून जातात, त्याप्रमाणे अंधःकाराला दूर टाकून दिले आहे.

अशा प्रकारे पृथ्वी, अग्नी आदी निसर्गदेवतांवरदेखील ऋषींनी सूक्ते रचलेली आहेत :

शिवा नः सख्या सन्तु भ्रात्राऽग्ने देवेषु युष्मे ।
सा नो नाभिः सदने सस्मिन्नूधन् ॥

—हे अग्ने, तुझ्या दिव्य विभूतीशी जडलेले आमचे मित्रत्व आणि बंधुत्व आम्हांस मंगलप्रद होवो. कारण या धरित्रीच्या वक्षःस्थलावर या यज्ञगृही आता आम्हांला मुख्य आधार तेवढाच आहे.

आर्यऋषींची ही भव्य व रम्य प्रतिभा विलक्षण स्तिमित करणारी आहे. 'कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया' नामक ग्रंथात याविषयी म्हटले आहे, "भारतीय आर्य हे निसर्गाच्या भव्योदात्त रम्यतेत वसत होते. हिमालयाची उंच बर्फाच्छादित शिखरे, विस्तीर्ण हिरवीगार कुरणे, प्रचंड नद्या, तिन्ही बाजूंनी भूमीला वेढणारे अमार्याद सागर, ऋतूंचे अनिर्वचनीय सौंदर्य यांनी त्यांच्या मनावर चिरंतन असा प्रभाव पाडला! अशा परिसरात वाढल्यामुळे भारतातील आर्यांनी फार पुरातन काळापासून काव्यानुकूल व आध्यात्मिक वृत्ती गंभीर, अंतर्मुख मनासह जोपासली असली पाहिजे. यामुळे इतर जगापासून तो वेगळा झाला. वेदपूर्व कालात त्याची ही काव्यानुकूल वृत्ती सुंदर निसर्गदृश्यांमुळे हेलावून गेली असली पाहिजे, व त्याच्या बालसदृश सरलतेमुळे निसर्गाच्या या अद्भुत घटनांत त्याला चिरंतन तत्त्वाच्या आविष्कारांची व प्रतीकांची जाणीव होऊ लागली आणि आदराने भयचकित होऊन त्याने त्या दिव्यतेला पूजा अर्पण केली."

उषःसूक्तांविषयी मॅक्डोनल या पंडितानी म्हटले आहे, "उषःसूक्ते म्हणजे वैदिक काव्यामधील नितांत मनोहर निर्मिती असून कुठल्याही

वाङ्मयाच्या धर्मपर भावकाव्यात याहून अधिक सुंदर रूपाचे दर्शन होत नाही. "

या उषःसूक्तांवरूनही लोकमान्य टिळक यांच्यासारख्या संशोधक विद्वानांनी आर्यांच्या मूलस्थानांविषयी अंदाज अनुमान व्यक्त केले आहे. वेदवाङ्मयात वर्णिलेली उषा ही ध्रुवप्रदेशातली असावी, कारण तिथे उषःकाल अन्य ठिकाणांपेक्षा बराच दीर्घ काळ अस्तित्वात असतो, आणि तोही दीर्घ अशा रात्रीनंतर आलेला असतो.

" दीप्तीमान किरणे असलेली ही सुंदर उषा प्रकटली आहे. तिच्यासाठी अंधेऱ्या रात्रीने तिचे प्रासाद मोकळे केले आहेत. सूर्य हा त्यांचा बंधू एकच आहे. अशा अमर रात्री व उषा एकमेकींना अनुसरत, उजळत आणि रंग पालटीत भ्रमण करीत आहेत. "

अशी वर्णने ध्रुवप्रदेशातील स्थितीच दाखवितात असे लो. टिळक म्हणतात व आर्यांच्या वसतीस्थानाचे अनुमान करतात.

आर्यांच्या काव्यप्रतिभेची व सौंदर्यदृष्टीची मात्र या सूक्तांवरून ओळख पटते. एक विद्वान म्हणतात, " ऋग्वेद संहिता म्हणजे कवीच्या प्रबळ भावनोद्रेकातून फुललेल्या सुंदर गीतांचा संग्रह आहे. आर्य कवींनी प्रकाशणाऱ्या उषा, नक्षत्रांकित रात्री, उगवत्या सवित्याचे लखलखते किरण, त्याप्रमाणे माध्यान्हीच्या सूर्याचे दाहक किरण, उदात्त सूर्यास्त, वादळी पाऊस व सोसाट्याने वाहणारे वारे यांना सौंदर्यमय करून टाकले आहे. "

आर्यांची दृष्टीच अशी आनंदमय होती. कल्याणकारी होती. तिमिराकडून तेजाकडे धावणारी नित्य विकासी होती. म्हणून त्यांचे संकल्पही त्यांच्या या उदार, व्यापक, सुंदर व आनंदवृत्तीतूनच उद्घोषित झालेले आहेत. ते उद्गारतात ' सर्वेऽत्र सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयाः॥ ' तर

BVBK-0402265
२२६५ २२/९/८८